# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २२.१२.२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१८) इतिवृत्त**

गुरूवार दिनांक २२ डिसेंबर २००५ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशीनाथ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी १२.४५ वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०२) सौ. जधव संगिता विठ्ठलराव
(०३) सौ. दलाल लता श्रीनिवास
(०४) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०५) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(०६) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(०७) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(०८) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(०९) श्री.मुजीब आलमशाह खान
(१०) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

<u>संवाद :</u>

श्री.गजनन बारवाल : मागिल बैठकीत या सभागृहाने जकातीचे खाजगीकरण करण्याचा ठराव पारीत केलेला होता व खाजगीकरण करतांना महानगरपालिकेचे हित जपून आर्थिक उत्पन्न कसे वाढविता येईल यासाठी प्रयत्न करावे अशी सविस्तर चर्चा झालेली होती. परंतू आजच्या दैनिक लोकमत वृत्तपत्रात जकातीचे खाजगीकरण करण्यासंदर्भात टेंडर नोटीस आलेली आहे. त्यात १०९ कोटीचे उद्दीष्ट दिलेले आहे. या सभागृहाने किंवा सर्वसाधारण सभेचे तसा ठराव पारीत केला नव्हता किंवा तशी चर्चाही केलेली नव्हती असे असतांना प्रशासनाने १०९ कोटीचे उद्दीष्ट ठरवून टेंडर नोटीस दिलेली आहे. याचे कारण काय यासंबंधी खुलासा घेण्यात यावा.

सौ.लता दलाल : जे समिती यासाठी नियुक्त केलेली होती त्या समितीने काय सुचविलेले होते. समितीने काही सूचवल्यानुसार टेंडर नोटीस देण्या अगोदर तसा विषय या सभागृहासमोर मंजूरीसाठी येणे आवश्यक होते. समितीचा अहवाल काय होता तो सादर करण्यात यावा.

श्री.विनायक पांडे : आताच दोन्ही जेष्ठ सदस्यांनी मुद्या उपस्थित केलेला आहे. तो लक्षणीय असा असून स्थायी समितीची परवानगी घेतल्याशिवाय प्रशासन निविदा काढत असेल तर कोणत्या नियुमानूसार निविदा काढलेली आहे, कोणत्या अधिकारात काढलेली आहे. कोणत्या समितीने हे टारगेट दिलेले होते. त्यानुसार अटी शर्ती ठेवलेल्या आहेत या संपूर्ण बाबीचा खुलासा करावा.

श्री.मुजीब खान : जकात हे महानगरपालिकेचे मुख्य उत्पन्नाचे साधन आहे. वारंवार या विभागावर चर्चा करणे उचीत वाटत नाही परंतू आजच्या सामना वृत्तपत्रात आले की कोठे कोठे भ्रष्टाचार होत आहे. अनेक वेळा वृत्तपत्रात असे छापून येते. स.सदस्य

सभागृहात चर्चा करतात निर्णय होतात परंतू कार्यवाही होत नाही. यापूर्वीही मी ८ पावती बुकांच्या संदर्भात चौकशी करण्याबाबत सूचविले होते. मा.आयुक्त यांनी या संदर्भात चौकशी केली जईल असे आश्वासन दिले होते. चार पाच वेळेस मला बोलविले माहिती घेण्याचा प्रयत्न केला परंतू कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या संदर्भात उपआयुक्त यांना सुध्दा माहिती दिलेली होती. कोणत्याही स.सदस्यांनी जकात संदर्भात माहिती दिली तक्रार दिली तर त्याची दखल घेतली जत नाही. ते प्रकरण हेतूपूरस्सर बाजूला ठेवले जते की काय अशी शंका येत आहे. चौकशी होण्यास वेळ लागत असेल तर मी या संबधी न्यायालयात दाद मागेल व माहिती घेईल. तसेच आताच स.सदस्य श्री. बारवाल यांनी म्हटल्याप्रमाणे जकातीच्या खाजगीकरणा संबधी कशा प्रकारे कार्यवाही करायची सर्व चर्चा झालेली होती. स्थायी समिती व सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानंतर वृत्तपत्रात वेगळेच छापून येते. टेंडर नोटीस काढली त्यात १०९ कोटीचे टारगेट दिलेले आहे. कोणत्या निकषावर दिलेले आहे. सर्व पदाधिकारी व प्रशासन यांनी एकत्रित बसून योग्य तो निर्णय घ्यावयास पाहिजे होता. परंतू तसे होत नाही प्रशासन प्रशासनाची बाजू मांडत कार्यवाही करीत आहे हे योग्य नाही. जकात विभागातील भ्रष्टाचार करणाऱ्यांना तेथून बदली केली पाहिजे त्याची चौकशी तात्काळ झाली पाहिजेअशी माझी मागणी आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : जकात संदर्भात प्रशासनाने समिती नियुक्त केलेली होती त्या समितीने काय अहवाल दिलेला आहे. किती टारगेट दिलेले होते. १०९ कोटीची निविदा कशाच्या अधारे काढलेली आहे या बाबतीतही खुलासा करावा.

सौ.लता दलाल : मा.आयुक्तांनी जकात खाजगीकरणा संदर्भात समिती नियुक्त केलेली होती अशी माझी माहिती आहे. त्या समितीने काय अहवाल दिलेला आहे.

श्री.कवरसिंग बैनाडे : १०९ कोटीचे टारगेट देवून जकात खाजगीकरणाची निविदा निघालेली आहे. हे टारगेट कशाच्या अधारे प्रशासनाने निश्चित केलेले आहे. जकातीचे या वर्षाचे टारगेट हे ८३ कोटीचे असून त्यात २० टक्के वाढ केली तरी ९७ ते ९८ कोटी होतात. इतर खाजगी व्यक्ती १०९ कोटी जकात उत्पन्न म्हणून वसूल करणार असेल व तसे प्रशासनास वाटत असेल तर प्रशासनानेच वसुली करावी खाजगीकरण करण्याची आवश्यकता नाही. १० ते १२ कोटी कशासाठी वाढवून दिलेले आहे. यावरून असे दिसून येते की प्रशासनालाच असे वाटते की खाजगीकरण होवू नये. एवढे टारगेट दिल्यानंतर पाहिजे तसा प्रतिसाद मिळणार नाही.

श्री.मुजीब खान : शासनाने दिलेल्या जकात संदर्भातील निर्देश दिल्याची प्रत माझ्याकडे आहे. सचिव यांना सभागृहात वाचण्यासाठी द्यावी त्यावरून सर्व माहिती मिळेल. जी १०९ कोटीचे टेंडर नोटीस दिलेली आहे सर्व क्लिअर होईल.

मा.सभापती : स.सदस्यांनी वृत्तपत्रात आलेल्या जकात टेंडर नोटीसच्या संदर्भात खुलासा करण्याची मागणी केलेली आहे. जकातीचे खाजगीकरण व्हावे म्हणून स्थायी समिती व सर्वसाधारण सभेने ठराव पारीत केलेला आहे. त्यानंतर जकात सुसुत्रीकरणाचा प्रस्ताव या सभागृहासमोर आला त्यानंतर सर्वसाधारण सभेत काही दुरूस्त्या सुचवून मान्यता देण्यात आली व जकातीचे खाजगीकरण करण्याची प्रक्रिया त्वरीत सुरू करावी म्हणून प्रशासनास निर्देश देण्यात आलेले होते. परंतू

आजअचानक जी टेंडर नोटीस काढलेली आहे त्यात १०९ कोटीचे टारगेट दिलेले आहे. परंतु ज्या महानगरपालिकेत जकातीचे खाजगीकरण झालेले आहे त्या संदर्भात ज्या प्रक्रिया झालेल्या आहेत तेथे सुध्दा जकात खाजगीकरणाची सन २००२ मध्येकार्यवाही झालेली होती. ज्यावेळी निविदा काढायच्या त्यात जे टारगेट ठरवायचे ते स्थायी समितीने ठरवले होते. त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता सुध्दा होती. परंतु ही सर्व कार्यवाही बाजूला ठेवून प्रशासनाने परस्पर जहीर टेंडर नोटीस काढलेली आहे. १० ते २० लक्षचे अंदाजपत्रकास या सभागृहाची मान्यता घेतली जते तर १०९ कोटीचे टारगेट ठरवतांना का नाही? हे सुध्दा एक अंदाजपत्रकच आहे. तसा प्रस्ताव या सभागृहासमोर येणे आवश्यक होते असे मत सभागृहाचे झालेले आहे. तसेच जकात संदर्भात शासनाचे निर्देश काय आहेत व जी समिती नियुक्त केलेली होती त्या समितीचा अहवाल काय आहे व त्यांना कोणते अधिकार दिलेले होते काय सुचवले आहे या सर्व बाबीचा खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त : यात जेनिर्णय घेतलेले आहे ते आयुक्त म्हणून मी घेतलेले आहे. इतर जेकुणी समितीत होते त्यांचे विचार घेतलेले आहे. यात तीन मूद्दे आहेत एक खाजगीकरण करायचे आहे दुसरा मुद्दा असा की कमेटी करण्यात आली अहवाल काय आहे तसेच जेटारगेट दिले ते कसे ठरवले आहे व स्थायी समितीची मान्यता घेवून का करण्यात आले नाही, असे चार मुद्दे उपस्थित केलेले आहे. साधारणत: ऑक्टोबर महिन्यात या सभागृहाने जकातीचे खाजगीकरण करायचे म्हणून ठराव पारीत केलेला होता. हे होत असतांना प्रशासनाचे असे मत होते की अगोदर जकात सुसूत्रीकरण करू. जेणे करून जे लोक जकात भरतात त्यांना फायदा होईल, जे चोरी करतात खाजगीकरणाच्या माध्यमातून पकडता येईल. जकात खाजगीकरण व सुसूत्रीकरणाचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मार्फत दिनांक २८ नोव्हेबर २००५ च्या सर्वसाधारण सभेत ठेवण्यात आला त्यास मान्यता मिळाली. ठराव जे मंजूर झाला त्यात असे की, प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार जकात दराचे सुसुत्रीकरण सदर्भात प्रशासनाने प्रस्तावित केलेले व स्थायी समितीने शिफारस केलेले दोन्ही प्रस्तावित जकात दर नामंजूर करून विद्यमान जकात दर विचारात घेवून जकात दराची वसूली खाजगी अभिकर्ता मार्फत तातडीने करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. असा ठराव पारीत झालेला होता. पूढील कार्यवाही करण्यासाठी मा.महापौर यांनी आयुक्त म्हणून मला पत्र दिले त्यानुसार कार्यवाही सुरू करण्यात आली. हे करीत असतांना असे लक्षात आले की इतर महानगरपालिकेत जकातीचे खाजगीकरण झालेले आहे. तेथे खाजगीकरण होत असतांना काय अडचणी येत असतात व कोणत्या अटी शर्तीमूळे येत आहे याची माहिती घेवून अटी शर्ती टाकून टेंडर काढवे, असे ठरले. यासंबधीची माहिती घेण्यासाठी आयुक्तांच्या अधिकारात एक समिती नियुक्त केली ती समिती माहिती देणार होती. त्यात दोन्ही उपआयुक्त, जकात अधिक्षक, मुख्य लेखा परीक्षक होते. तसेच शासनाचे जे डायरेक्शन असतील ते सर्व विचारात घेवून माझ्याकडे माहिती दयावी, असे सुचवले होते. कोणत्या नियमानुसार खाजगीकरण करीत आहे ते वाचून दाखविण्यात येत आहे. नियम ३५ नुसार जकात व पथकर यांची वसूली कशाप्रकारे करता येईल या संबधीचे आहे. जकात

कर व पथकर, नगरपालिका व महानगरपालिका अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना आयुक्तांच्या आदेशानुसार वसुल करता येईल किंवा आयुक्तास योग्य वाटेल तर स्थायी समितीच्या मान्यतेने एका वेळेस जस्तीत जस्त एका वर्षाच्या कोणत्याही कालावधीसाठी जकात कर व पथकर वसुल करण्याचा मक्ता देता येईल किंवा आयुक्त स्थायी समितीच्या मान्यतेने या वसुलीसाठी ज्या व्यक्तीस आपला अभिकर्ता म्हणून नेमेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या आदेशान्वये किंवा तद्नुसार अशी जकात किंवा पथकर वसूल करता येईल. या सेक्शनखाली जकात खाजगीकरणाच्या वसूलीसाठी ठेका देत आहे.

मा.सभापती : पुन्हा एकदा खुलासा करावा की टेंडर काढण्या अगोदर स्थायी समिती समोर येणे आवश्यक नव्हते का?

मा.आयुक्त : यात असे आहे की आयुक्तास योग्य वाटेल तर स्थायी समितीच्या मान्यतेने कार्यवाही करावी. स्थायी समितीच्या मान्यतेशिवाय करता येत नाही परंतु आयुक्तांना सुध्दा योग्य वाटले पाहिजे

मा.सभापती : सभापती किंवा आयुक्त हा विषय नाही. सर्व नियमानूसार कामकाज चालते. नियमात स्पष्ट दिलेले आहे की स्थायी समितीच्या मान्यतेने, त्यानंतर आयुक्त ते विखंडीत करू शकतात यात शंका नाही तो अधिकार आयुक्तांना आहे.

मा.आयुक्त : जकात वसुल करण्याची जबाबदारी ही आयुक्तांची असते. आयुक्तांना योग्य वाटेल तर स्थायी समितीच्या मान्यतेने यासाठी एजन्ट नेमू शकतात.

श्री.मुजीब खान :१०९ कोटीचे टारगेट कशाच्या अधारे ठेवलेले आहे हा खुलासा होणे गरजेचे आहे.

मा.आयुक्त : यासाठी कमेटी केलेली होती आवश्यक वाटत असेल तर इतर महानगरपालिकेत परीस्थिती पाहून यावी माहिती घ्यावी असे कमेटीला सुचीत केलेले होते. तसेच लोकांना काय त्रास होतो व कोणत्या कारणामूळे होतो, त्यानुसार अटी शर्ती टाकावयाच्या होत्या. कारण जकात वसूल करण्याची जबाबदारी आयुक्ताची आहे. ही वसूली करतांना लोकांना त्रास होवू नये म्हणून अभ्यास करण्यासाठी माझ्या अधिकारात कमेटी नियूक्त केलेली होती. त्या कमेटीच्या बरोबर माझी चर्चा झाली व त्यानंतर पूढील कार्यवाही आयुक्त म्हणून मी केलेली आहे. यात दोन बाबीवर निर्णय घ्यायचा होता किती टारगेट ठेवायचे, दुसरे असे की अटी शर्ती काय नमूद करायच्या. परंतु अटी शर्ती हया नियमाप्रमाणेच दिलेल्या आहे जे रेग्यूलर टेंडर निघते त्याप्रमाणे आहे. यात एकच असे दिले आहे की इतर महानगरपालिकेत जे सेक्यूरटी डिपॉजेट आहे ते १६ टक्के ठेवलेले आहे. एवढी टक्केवारी जस्त होते म्हणून यात १० टक्केच सेक्यूरटी डिपॉजेट ठेवलेले आहे. शासनाचा जे जी.आर. आहे तो नगरपालिकेसाठी आहे. शासनाने जर कोणत्याही जी.आर.मध्ये एक प्रीन्सीपल ठेवले असेल तर ते ग्रहीत धरायला हरकत नाही.

श्री.गजनन बारवाल : नगरपालिकेचा जी.आर. महानगरपालिकेस लागू पडतो का

मा.आयुक्त : शासनाने नगरपालिकेसाठी जी.आर काढलेला आहे त्यास अनूसरून करायला काही हरकत नसावी. शासनाचे असे म्हणणे आहे की जनरली जकात ही १० टक्क्यांनी वाढ होते. खाजगीकरणामूळे आणखी १० टक्केनी वाढ झालीच पाहिजे ते मिळून २० टक्केनी वाढवावे तसेच जे खर्च येतो तो मिळून म्हणजे २

टक्के असे मिळून २२ टक्केनी वाढ करावी असे शासनाचे नगरपालिकेसाठी जी.आर आहे. यात अस्थापना खर्च २ टक्के तसेच खाजगीकरण करीत आहेत म्हणून १० टक्के तसेच नैसर्गीक वाढ याप्रमाणे वाढविले आहे. गेल्या वर्षीचे टारगेट नुसार ७१ कोटी वसूल झालेले आहे. या वर्षी ८३ कोटीचे दिलेले आहे. त्यानुसार नैसर्गीक वाढ धरल्यास ही १६.९टक्के येते ते ९७ कोटी होते. त्यावर १० टक्के खाजगीकरण होते आहे म्हणून वाढ केलेली आहे, २ टक्के हा अस्थापनेचा खर्च असे मिळून १०९ कोटीचे टारगेट ठरवलेले आहे.

मा.सभापती : खाजगीकरण होते म्हणून कोणत्या नियमाने १० टक्के वाढ करता येते.

मा.आयुक्त : त्या संबधीचे नियम वगैरे नाही. शासनाचे नगरपालिकेसाठी एक धोरण आहे ते थोडेसे गाईडलाईन्स देवू शकते.

मा.सभापती : खाजगीकरण होण्यास सर्वांचा पाठींबा आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले पाहिजे ही अपेक्षा सर्वाना आहे. परंतू जी कार्यवाही करीत आहोत ती नियमाप्रमाणे झाली पाहिजे. कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही. स्वत: आयुक्तांना वाटले म्हणून निर्णय घेतला असे निर्णय या सभागृहाला मान्य नाही. नियमाचा आधार घेवून ही कार्यवाही करावी असे सभागृहाचे मत आहे.

मा.आयुक्त : जे आपल्याला योग्य वाटते ते आपण करू शकतो. यामध्ये किती टक्के वाढ करावी हे नियमात नाही. सेक्शन ३५ मध्ये जे काही दिले आहे त्यात आयुक्त यांना ही जकात वसूल करायची आहे आणि आयुक्तांना योग्य वाटत असेल तर स्थायी समितीच्या मान्यतेने कार्यवाही करू शकतो.

मा.सभापती : डायरेक्ट आयुक्तांना अधिकार नाही. अगोदर स्थायी समितीची मान्यता पाहिजे असे आहे. पुन्हा पुन्हा आपण सांगतात की मला अधिकार आहे म्हणून केले हे योग्य नाही.

मा.आयुक्त : यात असे दिले की आयुक्तास योग्य वाटेल तर स्थायी समितीच्या मान्यतेने असे आहे. जकात वसूल करण्याची जबाबदारी ही आयुक्ताची असते. परंतु एजन्ट नेमावयाचे असेल तर स्थायी समितीच्या मान्यतेशिवाय करू शकत नाही. ९७ कोटीमध्ये १० टक्केची वाढ केल्यास १०६.७३ कोटी होते. तसेच सर्वसाधारण सभेत जी चर्चा झाली त्यावेळी बऱ्याच सदस्यांनी असे म्हटले होते की खाजगीकरणामूळे १० ते १५ कोटीचे उत्पन्न जस्त येईल. इतिवृत्तात पण आलेले आहे. नैसर्गीक वाढ करून ९७ कोटी होतात त्यात १० टक्केनी वाढ करून जे शासनाचे नगरपालिकेसाठी शासनाने धोरण ठरवले आहे त्याचा बेस घेवून केलेले आहे. यावर २ टक्केनी वाढ केली असता १०८.८६ कोटी होतात. या एवेजी आणखी वाढ करून ते १०९ कोटी केलेले आहे. कमेटीने दिले ते टारगेट दिले ते मला मान्य झाले किंवा नाही असे काहीही नाही. माझ्या डायरेक्शन प्रमाणे १०९ कोटी निश्चित टारगेट केले उर्वरीत ज्या फिगर दिलेल्या आहे त्या टक्केवारीनूसार आहे. दुसरा मुद्दा असा की स्थायी समितीच्या मान्यतेशिवाय करू शकत नाही. परंतू हे १०९ कोटीचे टेंडर आहे . टेंडर आल्यानंतर स्थायी समितीच्याच मान्यतेसाठी येणार आहे. तसेच प्रिबीड मध्ये सुध्दा चर्चा करायची आहे. त्यावेळी टेंडर घेणारे यांचे समवेत सर्व पदाधिकारी नगरसवेक चर्चेच्या वेळी हजर राहू शकतात. टेंडर आल्यानंतर ते स्थायी समितीच्या मान्यतेसाठी येणार असून स्थायी समितीने मान्यता दिल्यानंतर पूढील कार्यवाही होणार आहे. परंतू मला असे वाटते

की स्थायी समितीमध्ये ठराव झाला त्यानंतर जकात सुसूत्रीकरणाचा ठराव झाला, सर्वसाधारण सभेत ठराव झाला. मा.महापौर यांनी सुध्दा पत्र देवून कार्यवाही करायचे सांगितले होते. त्याप्रमाणे १०९ कोटी टारगेट ठरवून टेंडर काढलेले आहे. जेकाही टेंडर येईल व अटी शर्ती ज्या आहेत त्या पण आपल्या मान्यतेसाठी समोर येणार आहे व स्थायी समितीच्या मान्यतेनूसार ज्या एजन्टला मान्यता देण्यात येईल त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

श्री.गजनन बारवाल : मा.आयुक्तांनी जे खुलासा केला तो योग्य वाटत नाही. कारण या वर्षीचे टारगेट हे ८३ कोटीचे दिलेले आहे. मागिल तीन वर्षाचे उद्दिष्ट व वसूली बघीतली तर कूठेतरी चूक होते आहे हे दिसून येईल व १०९ कोटीचे जेटारगेट दिले आहे ते अत्यंत चूकीचे आहे असे वाटते. ८५ कोटी, १०० कोटीपर्यत टारगेट ठेवले असते समजू शकलो असतो. परंतू १०९ कोटी ठेवले जेजस्त होते. या संदर्भात माहिती घेण्यासाठी मा.आयुक्त यांनी प्रशासकीय कमेटी नियूक्त केलेली आहे समितीने किती टारगेट ठेवावे हे दिले असेल त्या बाबतीत खुलासा करावा.

श्री.कवरसिंग बैनाडे : या वर्षीचे जकातीचे टारगेट हे ८३ कोटीचे ठेवलेले आहे. एवढी रक्कम वसूल होणार नाही तर १० टक्के नैसर्गीक वाढ का समाविष्ट करण्यात आलेली आहे. कारण आजपर्यत जेटारगेट दिलेले होते ते पूर्ण झालेले नाही. नियमाप्रमाणे ९९ ते १०० कोटीचे टारगेट ठरवून निविदा काढली तर अनेक एजन्सीजपुढे येतील.

श्री.गजनन बारवाल :८३ कोटीचे टारगेट या वर्षीचे आहे. तेवढी वसूली होणार नाही तर १० टक्के नैसर्गीक वाढ धरता येत नाही. आतापर्यत किती वसूली झालेली आहे यावरून टारगेट पूर्ण होईल की नाही हे समजून येईल.

मा.आयुक्त : जकात खाजगीकरण करायचे हे पूढील वर्षासाठी आहे. ८३ कोटीचे टारगेट या वर्षासाठी दिलेले आहे ते वसूल करण्याचा प्रयत्न प्रशासन करणार आहे.

मा.सभापती : मा.आयुक्त हे सविस्तर खुलासा करणार आहेत. माहिती मागवून घेत आहेत. समितीत कोण होते त्यांनी काय अहवाल दिला याची माहिती देणार आहेत.

श्री.कवरसिंग बैनाडे : ८३ कोटी वसूल होणार नाही. होणार असेल तर तसा खुलासा करावा.

मा.सभापती : मागिल तीन वर्षात दरवर्षी किती टारगेट ठेवण्यात आलेले होते व प्रत्यक्षात वसूली किती झालेली आहे मागिल कोणत्या वर्षी टारगेट पूर्ण केलेले आहे.

मा.आयुक्त : मागिल माहिती जकात अधिक्षक देतील परंतू मागिल वर्षी ७६ कोटीचे टारगेट होते. रिवाईजकरून ७२ कोटी करण्यात आलेले होते व प्रत्यक्षात वसूली ही ७१ कोटी झालेली आहे. यावर्षी ८३ कोटी टारगेट दिलेले आहे ते मार्च अखेर पूर्ण करू वसूल करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे.

मा.सभापती : महाराष्ट्र शासनाचे काय अध्यादेश आहेत ते सभागृहात वाचून दाखवावे. जी समिती नियूक्त केलेली होती त्या समितीने काय सूचविलेले आहे त्याचा अहवाल त्या समितीने दिलेले टारगेट व आयुक्तांनी केलेला बदल यासंबधीची संपूर्ण माहिती या सभागृहासमोर येणे गरजेचे आहे. माझ्या माहिती प्रमाणे जेजस्तीचे टारगेट ठेवले आहे त्यासाठी शासनाचे कोणतेही निर्देश नाही. समितीमध्ये कोण अधिकारी नियुक्त केलेले होते त्याची पून्हा माहिती देण्यात यावी.

मा.आयुक्त : समिती ही मला माहिती देण्यासाठी नियुक्त केलेली होती.

उपआयुक्त(महसूल) : नोव्हेंबर महिण्यामध्ये व त्यानंतर सर्वसाधारण सभेमध्ये दुरूस्तीनुसार जे प्रस्ताव पारीत केला होता. त्याचप्रमाणे मा.आयुक्तांच्या मान्यतेने जकातीच्या

खाजगीकरणाची एकंदरीत प्रक्रिया, अटी शर्ती ठरविणे इतर महानगरपालिकेची माहिती मागविणे त्याच बरोबर टेंडर स्विकारणे ते उघडणे व त्यानंतर जकात खाजगीकरणास एक वर्षाचे अधिकार दिल्यानंतर या संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी मा.आयुक्त यांना सहकार्य करण्यासाठी एक समिती नियुक्त करण्यात आलेली होती त्यात उपआयुक्त महसूल, प्रशासन तसेच जकात अधिक्षक व मुख्य लेखा परीक्षक होते. या समितीच्या झालेल्या बैठकामधून काही ठळक गोष्टीवर चर्चा करण्यात आली व मा.आयुक्त यांच्या निर्देशानुसार या समितीकडे खालील कामे सोपविण्यात आलेली होती.

१. इतर महानगरपालिकेकडून माहिती घेवून या महानगरपालिकेसाठी अटी शर्ती निश्चित करणे, २. जकात खाजगीकरणाची आधारभूत किंमत ठरविणे, ३.जकात खाजगीकरणाची एकंदर प्रक्रिया अंतिम करणे, ४. टेंडरची तारीख ठरवणे, ५. आलेले टेंडरची छाननी करणे तसेच तुलनात्मक तक्ता व सर्वोत्कृष्ट ऑफर तयार करणे. अटी शर्ती ठरवतांना इतर महानगरपालिकेचा अनुभव लक्षात घेवून संपूर्ण प्रक्रिया चांगल्या पध्दतीने कशी होईल याकडे लक्ष देणे तसेच जनतेला त्रास होणार नाही याकडे विशेष लक्ष द्यावे. असे समितीचे एकंदर स्वरूप होते. या समितीने टेंडर साठी ज्या अटी शर्ती लागतात त्या ठरवलेल्या होत्या. मुळ मुद्दा जकातीचे एकूण उद्‌दिष्ट किती असावे. समितीने ८३ कोटीचे उद्‌दिष्ट व त्यात २० टक्के वाढ आणि दोन टक्के अस्थापना खर्च असे एकूण १०२ कोटीचे टारगेट निश्चित केलेले होते. या समिती समवेत मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत चर्चा होवून महानगरपालिकेचे एकंदर जकातीची वसूली पाहता ८३ कोटीचे उद्‌दिष्ट व मागिल वर्षाचे उद्‌दिष्ट ७१ कोटीचे पाहता ही वाढ सर्वसाधारणपणे १६.९० टक्के एवढी आहे. ही वाढ गृहीत धरून पूढील वर्षाचे उद्‌दिष्ट हे ९६ ते ९७ कोटीचे होते. जकातीचे खाजगीकरण होत आहे व या माध्यमातून आणखी उत्पन्न मिळावे म्हणून यामध्येआणखी १० टक्के रक्कम समाविष्ट करून १०९ कोटी ठेवलेले आहे. खाजगीकरण करतांना महानगरपालिकेस निश्चिपणे फायदा होणार आहे. हा फायदा सर्वसाधारण पणे १० टक्के असेल असा प्रशासनाचा अंदाजआहे. याला कुठलाही नियम नाही.

श्री.कवरसिंग बैनाडे : यावरून खाजगीकरण करण्यास प्रशासनाचेच मत नाही. मागिल तीन वर्षाची वसूली झालेली पहावी. गेल्या वर्षी टारगेट रिवाईज करून ५ कोटीचे नुकसान झालेले आहे. या वर्षात ठेवलेले टारगेट नुसार नैसर्गीक वाढ करता व अस्थापनेवरील खर्च समाविष्ट करता १०१, १०२ कोटीचे टारगेट असावे. तरच प्रतिसाद मिळेल. टेंडर फिस २० हजर ठेवण्यात आलेली आहे.

मा.आयुक्त : एकूण टारगेटनुसार टेंडर फिस ठेवली असती तर आणखी वाढली असते. कमी ठेवलेली आहे.

श्री.कवरसिंग बैनाडे : जकातीचे खाजगीकरण करण्यास सर्वांचा पाठींबा आहे परंतू टारगेट वाढवून दिल्यामुळे होणार नाही अशी शंका येते. प्रशासनास खाजगीकरण करायचे नाही असे वाटते.

मा.आयुक्त :१० ते १५ कोटी खाजगीकरणाच्या माध्यमातून मिळत असतील तर काय हरकत आहे. खाजगीकरण करून उपयोग झाला पाहिजे

मा.सभापती : आताच उपआयुक्त (महसूल) यांनी खूलासा केला समिती नियूक्त केलेली आहे त्या समितीने मा.आयुक्तांना मार्गदर्शन केले. उपआयुक्त(महसूल) हे त्या समितीचे अध्यक्ष होते. या समितीत मुख्य लेखापरीक्षक सुध्दा होते. मुख्य लेखापरीक्षक यांना या समितीत नियमाप्रमाणे घेता येते का व उपआयुक्त यांचे अध्यक्षतेखाली त्या पदावरील अधिकारी काम करू शकतात काय? मुख्य लेखापरीक्षक यांचे काम काय असते याचा खुलासा देखील करण्यात यावा.

मा.आयुक्त : या कमेटीत मुख्य लेखापरीक्षक होते. हे मला सुध्दा मान्य आहे की या पदावरील अधिकारी हे महानगरपालिकेत सर्वसाधारण सभेच्या अधिपत्याखाली काम करतात. असे कुठे ही नाही की त्याचा वेगळा वापर करून घेत आहोत. एखादया प्रकरणात प्री ऑडीट करून घ्यायचे असेल तर प्रशासन मागणी करू शकते. यात मोठया रक्कमेचा व्यवहार आहे म्हणून त्यांना घेण्यात आलेले होते. त्यानंतर मा.महापौर यांनी सांगितले की ते सर्वसाधारण सभेच्या अधिपत्याखाली काम करतात त्यांना कमेटीत घेवू नये. त्यानंतरही मा.महापौर यांना मी विनंती केली की महासभेचे प्रतिनिधी म्हणून त्यांना घेतलेले आहे त्यावर मुख्य लेखापरीक्षक यांनी पत्र देवून कळविले की माझ्याकडे खूप काम आहे. १० ते१५ वर्षापासूनची चौकशी करायची आहे. म्हणून त्यानूसार त्यांना कमेटीतून वगळण्यात आले.

श्री.मुजेब खान : मागिल दोन वर्षाचे टारगेट दिलेले पूर्ण झालेले नाही. खाजगीकरणाच्या प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतर सुसूत्रीकरणाचा प्रस्ताव काही वस्तूंवरील जकात दर कमी जस्त करून सादर केला होता त्यात केमीकलचे दर कमी केलेले होते. त्यामूळे जे उत्पन्न येणार होते त्यापेक्षा ८ ते १० कोटी कमी आले असते. टेंडर काढल्यानुसार जेमुळ या वर्षीचे टारगेट आहे ते वसूल झाले पाहिजे त्यावर आपण २२ टक्केनी वाढ करीत आहेत. परंतू जेउद्दिष्ट ठेवले जते ते पूर्ण होत नाही..

मा.आयुक्त : जकात सुसूत्रीकरणाचा प्रस्ताव ठेवला होता त्यात किती कमी जस्त होईल हे दिलेले होते. मंजूर झाले असते तर ९९.२७ कोटीपर्यत टारगेट असते. त्यामूळे आता नुकसान होण्याचा प्रश्नच येत नाही.

श्री.मुजेब खान : जेटारगेट दिले जते तेवढी वसूली होत नाही. त्यावर १० अधिक १० टक्के असे एकूण २२ टक्केनी वाढ करीत आहोत. या संदर्भात शहरातील जेजनकार लोक आहे येथून प्रतिनिधीत्व करून गेलेले आहे ते आम्हाला विचारतात की हा काय प्रकार चालू आहे. चांगल्या लोकांचे आम्ही काय करतो याकडे लक्ष असते. सभागृहातील भावना बाहेर जवू नये. त्यासाठी प्रशासन व पदाधिकारी पैकी मा. महापौर, मा.सभापती व जेया संबधी तज्ञ जणकार असेल त्यांनी एकत्रित बसून चर्चा करून योग्य तो निर्णय घ्यावा. विकास कामे होण्यासाठी हा निर्णय आपण घेत आहोत. याकडे प्रशासन व लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही काम करतो दुर्लक्ष होवू नये. जकातीचे खाजगीकरण झाले पाहिजे ही सर्वांचीच भावना आहे. आठ महिने झाले एक ही अंदाजपत्रक मंजूर झालेले नाही. विकास कामे होत नाही. अधिकारी यांना विचारणा केली असता त्यांना सर्व माहित असतांना नगरसेवकांना विचारणा होते कोणते काम आहे, कुठे करायचे आहे, हे बरोबर नाही. काही ठिकाणी दोन्ही भागाकडून काम होते मधल्या भागातील सोडले जते. असे एक डांबरीकरणाचे काम माझ्या बाजूच्या वार्डात झालेले आहे.

मा.आयुक्त : शेवटी शेवटी कालावधीत टारगेटनूसार बोलत नाही निश्चित वसूली किती होत गेली त्याचा खुलासा करीत आहे. मागिल दोन वर्षापूर्वी १६.१० टक्के त्यानंतर गेल्या वर्षी १० टक्केनी वसूलीचा स्त्रोत वाढला. या वर्षी निश्चित फिगर माझ्याकडे नाही ८३ कोटीचे टारगेट गृहीत धरून १६.०९ टक्केची जम्प आहे. जकात खाजगीकरण झाले तर प्रत्येक वेळी चर्चा होत असे की १० ते १५ कोटीचा फायदा होणार आहे. महानगरपालिकेने वसूल केले असते तर टारगेट हे ९८ कोटीपर्यंत असते. यात १० टक्केनी वाढ केलेली आहे. शासनाची सुध्दा तीच धारणा आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : जेटारगेट ठेवले जत असे ते पूर्ण होत नसे १० ते २० टक्के कमी रक्कम वसूल होत होती म्हणून १० ते १५ कोटीचा फायदा होईल अशी चर्चा होत होती.

मा.आयुक्त : खाजगीकरण केल्यास १० टक्केचा फायदा होत आहे. १० टक्के लिकेजेस होण्याची शक्यता आहे. या वर्षीचे जेटारगेट ठेवलेले आहे ते वसूल होणार आहेत.

सौ.लता दलाल : जे समिती नियुक्त केलेली होती त्या समितीने १०२ कोटीचे टारगेट सुचवले होते ते बाजूला ठेवून १०९ कोटी मा.आयुक्त यांनी त्यांचे अधिकारात टारगेट ठेवले परंतू १०९ कोटीचे टारगेट हे कशाच्या अधारे ठेवत आहे असा सर्वच सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. जेटारगेट ठेवलेले आहे ते २० ते २५ टक्केनी वाढवून ठेवलेले आहे असे माझे मत आहे. १० टक्के जकातमध्ये चोरी होते हे प्रशासनाने मान्य केलेले आहे. परंतू १०९ कोटीचे जेटारगेट दिले ते योग्य वाटत नाही. समितीने १०२ कोटी सुचविले असतांना आयुक्तांनी १०९ कोटी ठेवले यामागे कुणाचे प्रेशर आहे का अशी शंका येत आहे. याचाही खुलासा करावा. टेंडर देण्यापूर्वी हीच चर्चा आगोदर झाली असती तर या सभागृहाचा मान राखला गेला असता. तो आमचा हक्क होता. आमच्या अधिकारावर गदा आणलेली आहे त्यामूळे हा प्रस्ताव पून्हा दुरूस्तीसह स्थायी समितीसमोर ठेवावा. तोपर्यंत आजची सभा ही तहकूब करावी. आज स्थायी समिती बैठक आहे हे प्रशासनास माहित होते टेंडर नोटीस काढण्यास एवढी घाई का केलेली आहे.

मा.आयुक्त : मा.महापौर यांचे पत्र मला २९ तारखेला आलेले होते. या संदर्भात प्रोसेस चालू होती ती संपली म्हणून टेंडर नोटीस काढण्यात आली. समितीने १०२ कोटी दिले ते त्यात त्यांनी फक्त १० टक्के नैसर्गीक वाढ गृहीत धरलेली होती. यात ८३ कोटीवर १६.१० टक्के नैसर्गीक वाढ केलेली आहे ९७ कोटी होते. त्यात पून्हा खाजगीकरण करीत आहोत म्हणून १० टक्केनी वाढ केलेली आहे. शासनाचे पण डायरेक्शन जेनगरपालिकेसाठी आहे ते धोरण अवलंबीलेले आहे.

सौ.लता दलाल : शासनाचे आदेश वाचून दाखवावे. इतर महानगरपालिकेने या शासन आदेशाचा अवलंब केलेला नाही का? समितीने इतर महानगरपालिकेची माहिती घेतली तर ही माहिती उपआयुक्त यांचेकडे असेलच.

मा.आयुक्त : ज्या महानगरपालिकांमध्ये जकात खाजगीकरण करण्यात आले तेथे १० टक्केनी वाढ केलेली आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : सुधारीत प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवावा.

सौ.लता दलाल :अशा प्रकारचे टारगेट दिल्यास कोणी निविदा भरणार नाही. समितीने जेटारगेट दिले त्यानूसार या समितीसमोर प्रस्ताव आला असता तर त्यावर विचार करून निर्णय घेता आला असता.

मा.आयुक्त : जकातीचे खाजगीकरण करायचे नाही अशी प्रशासनाची भावना नाही.

सौ. लता दलाल : किती टारगेट ठरवायचे हा सभागृहाचा अधिकार आहे.

मा.आयुक्त : जे टेंडर भरून येईल ते या सभागृहासमोर येणारच आहे. त्यावेळी सभागृहाला जे वाटेल त्याप्रमाणे निर्णय घ्यावा. हे अंदाजपत्रक आहे किती रक्कमेपर्यंत निविदा भरून येईल हे आपणास माहित नाही. ज्या निविदा येतील त्यानुसार तसा प्रस्ताव आपल्या समोर येणारच आहे.

सौ.लता दलाल : टेंडर काढण्यापूर्वी या सभागृहासमोर प्रस्ताव आला असता तर आमचा अधिकार आम्हाला वापरता आले असते. परंतू तसे झाले नाही म्हणून आजची सभा तहकूब करावी व सुधारीत प्रस्ताव या सभागृहा समोर सादर करण्याचे आदेशीत करावे.

श्री. गजनन बारवाल : याची गंभीर दखल घ्यावी आमच्या अधिकारावर गदा आणलेली आहे. सभा सहकूब करावी दुरूस्तीसह प्रस्ताव सादर करावा.

श्री.मुजेब खान : मागिल वर्षी ७१ कोटीच वसूल झालेले होते त्याचे २० टक्केनी वाढ केल्यास ८२ कोटीच होतात. तर १०९ कोटी कशाच्या अधारे वाढ केलेली आहे.

मा.आयुक्त : या वर्षाची वसुली ही ८३ कोटी गृहीत धरलेली असून १६ टक्केची जम्प घेत आहोत. त्यानूसार नैसर्गीक वाढ व पून्हा खाजगीकरण करीत आहोत म्हणून १० टक्केची वाढ असे मिळून १०९ कोटी टारगेट ठेवलेले आहे.

मा.सभापती : हा विषय महानगरपालिकेचा अत्यंत महत्वाचा आहे. प्रशासनाचा जे खुलासा येत आहे तो योग्य वाटत नाही. त्यासाठी प्रशासनाने विचार पूर्वक माहिती घेवून यावी सभा ३.००वाजेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.(पून्हा सभेला सुरूवात ५.१५ वा.)

श्री.मुजेब खान : जकात खाजगीकरणाचे टारगेट १०९ कोटी कसे ठेवण्यात आले यावर चर्चा चालू आहे. प्रशासनाकडून जे खुलासा अपेक्षीत आहे तो मिळत नाही. मागिल वर्षी ७१ कोटी वसूल झालेले होते त्यावर२० टक्के वाढ ग्रहीत धरल्यास ८५ कोटी होते. त्यापूढील रक्कम का वाढण्यात आलेली आहे याचाही खूलासा होणे आवशयक आहे.

श्री.गजनन बारवाल :आताच आयुक्तांनी खुलासा केला की खाजगीकरणाचा प्रस्ताव प्रथमत: स्थायी समितीने मंजूर केलेला होता त्यानंतर सर्वसाधारण सभेने मान्यता दिली व त्यानंतर पूढील कार्यवाही मा.आयुक्तांनी सुरू केली. कालच जकात खाजगीकरणाची टेडर नोटीस काढण्यात आलेली आहे. त्यात १०९ कोटीचे टारगेट दिलेले आहे. जे जस्तीचे होते म्हणून सर्व सदस्यांनी त्या संदर्भात चर्चा केलेली आहे. प्रशासनाने खुलासा केला परंतू समाधान झालेले नाही. ८३ कोटी व १०९ कोटी यामध्ये मोठा फरक आहे. ८३ कोटीवर १६ टक्केनी वाढ केली व १० टक्के लिकेजेस आहे असे प्रशासनच कबूल करीत आहे. १०९ कोटी ऐवजे त्यापेक्षा कमी रक्कमेची निविदा आली तर त्या संदर्भात प्रशासनाची भुमिका काय राहणार आहे याचा खुलासा करावा. टेंडर नोटीस मध्ये क्र. ८ वर असे दिले की १०९ कोटीच्या कमी आलेली निविदा स्विकारणार नाही. यापेक्षा कमी रक्कमेची निविदा आल्यास पुन्हा निविदा व पूढील कार्यवाही करणार आहोत का यासंबधीचा संपूर्ण खूलासा करावा.

मा.सभापती : सर्वप्रथम १०९ कोटीची जी टेंडर नोटीस काढलेली आहे ती नियमानूसार बरोबर आहे का याचा खुलासा मुख्य लेखापरीक्षक यांनी करावा.

मुख्य लेखापरीक्षक : जकात खाजगीकरणाच्या संदर्भात जी काही चर्चा होत आहे त्याबाबतीत मा.आयुक्तांनी जी समीती गठीत केलेली होती त्या समितीने १०२ कोटीचे टारगेट दिलेले होते. या संदर्भात समीतीतील सर्व सदस्य व मा.आयुक्त यांची चर्चा होवून १०९ कोटीचे मा.आयुक्तानी टारगेट ठेवलेले आहे.

श्री.मुजीब खान :१०९ कोटीचे टारगेट ठेवलेले आहे त्यापेक्षा कमी १०१/१०२ कोटीची निविदा आली किंवा कुणी गुंडागर्दी करून वसूल करील शहरातील नागरीकांना त्रास होईल शांतता राहणार नाही. असे १२०,१३०,१३५ कोटीची निविदा भरून येवू शकतील. अशा वेळी प्रशासन काय निर्णय घेणार आहे.

मा.आयुक्त : जी कमेटी केलेली होती ती मला माहिती देण्यासाठी केलेली होती. या कमेटीने जेथे जेथे जकातीचे खाजगीकरण झालेले होते तेथील माहिती घेवून नगरपालिकेसाठी जे २० टक्केची वाढ विचारात घेवून १०२ कोटीचे टारगेट ठेवले होते. २० टक्केमध्ये १० टक्के हे नैसर्गीक वाढ असून १० टक्के ही जकात खाजगीकरण होते म्हणून वाढ केलेली आहे. परंतू मागील तीन वर्षाचा विचार केल्यास १६ टक्केने वाढ झालेली होती. त्यानंतर १० टक्केनी व या वर्षी १६ टक्केनी वाढ होत आहे. नैसर्गीक वाढ ही १० टक्के गृहीत धरणे योग्य नाही ती या वर्षात ज्या टक्केनी वाढ होते आहे ती धरावे म्हणून सांगितले. शासकीय संचिका आहे कुणाला बघायची असेल तर बघता येईल. मी माझ्या सहिने कॅल्क्यूलेशन करून दिलेले आहे. जे केलेले आहे ते बरोबर आहे असे माझे मत आहे. १०९ कोटीचे टारगेट ठेवले ते योग्य असून जणूनबूजून ठेवलेले नाही. तसा प्रशासनाचा काही हेतूही नाही. नागरीकांना त्रास होवू नये म्हणून त्या बाबतीतही अभ्यास केलला आहे व अटी शर्तीमध्ये टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. ज्या अटी शर्ती दिल्या त्या इतर कोणत्याही टेंडरमध्ये नाही. योग्य कारणामूळे काही प्रकार घडला तर त्या संबधीतास ताकीद देण्यात येईल व वारंवार तसे घडल्यास त्यांचे टेंडर रद्द करण्यात येईल.१०९ कोटीचे टारगेट दिलेले आहे. जर कुणी १४० कोटीचे टेंडर भरून देणार असेल व फारच त्रास देवून वसूली करणार असेल काय याचा विचार करून कार्यवाही केली जईल. फारच जस्त व फारच कमी असेल तर त्यावर अभ्यास करून कार्यवाही केली जईल. जे टेंडर भरून येईल त्यात स्पर्धा झालेली आहे की नाही याचा अभ्यास केला जईल. जर एकाच व्यक्तीने १०० कोटीचे टेंडर भरून दिले दुसऱ्याला भरू दिले नाही तर ते मान्य करता येणार नाही किंवा मोठया प्रमाणात स्पर्धा झाली व १४० कोटीपर्यंत आले तरी मान्य करता येणार नाही. जे १०९ कोटीचे दिलेले आहे ते योग्य आहे. जर १० लोकांनी टेंडर भरलेले आहे कॉम्पीटीशन झाले असे दिसून आले जर १०७ कोटी आले १०६ कोटी आले तर विचार करता येईल. एखादे रस्त्याचे कामाचे टेंडर हे २० ते २५ टक्के बिलो आले तर काम चांगले करणार का असा विचार केला जतो जर जस्तीचे ३० टक्केनी टेंडर आले तर एवढे जस्त का आले याचा विचार करतो. जे टेंडर भरून येईल त्यात कॉम्पीटीशन झाले पाहिजे योग्य टेंडर भरून आले पाहिजे हे प्रशासनाचे पहिल्या पासून निर्णय आहे. हे अंदाजपत्रक आहे यात नैसर्गीक वाढ तसेच १० टक्के जकात खाजगीकरण होत आहे म्हणून वाढविले आहे. २ टक्के अस्थापना खर्च असे मिळून कॅल्क्यूलेशन केलेले आहे. यात कॉम्पीटीशन झाले, योग्य फिगर आलेली आहे त्यानुसार स्थायी समितीकडे प्रस्ताव येईल. योग्य निर्णय

घ्यावा लागेल. असे होणार नाही की १०८ आले तर देणार नाही १११ कोटीचे टेंडर आले तर देणार परंतु १४० कोटीचे आले तर देणार नाही. त्यावर अभ्यास करून निर्णय घ्यावा लागेल.

श्री.बारवाल गजनन : वस्तूस्थिती नाकारता येणार नाही आज जकातीची वसूली बघीतली तर दररोज किती उत्पन्न येते व टारगेट नूसार बघीतले तर किती उत्पन्न दररोजचे येवू शकते हे लगेच कळते. अट क. ८ मध्ये असे दिले की १०९ कोटी पेक्षा कमी निविदा आली तर मान्यच करणार नाही असे दिलेले आहे.

मा.आयुक्त :१०९ कोटी पेक्षा कमी आले व कॉम्पीटीशन दिसून आले तर देता येईल परंतू एक निविदा आली व ती १०९ कोटी पेक्षा कमी आहे तर देता येणार नाही. योग्य रक्कम नमूद असलेले व स्पर्धा झालेले टेंडर भरून आले तरच कार्यवाही होईल.

श्री.मुजेब खान : आताच आयुक्तांनी म्हटले की योग्य टेंडर भरून आले व स्पर्धा झालेले दिसून आल्यास टेंडर दिले जईल. आयुक्तांनी जे खुलासा केलेला आहे त्या संबधी इतिवृत्तात सविस्तरपणे नोद करण्यात यावी व या संबधीची कार्यवाही ही तात्काळ करण्यात यावी.

मा.सभापती : आजच्या बैठकीच्या कामकाजची संपूर्ण नोंद इतिवृत्तात यावी. जकात खाजगीकरणाच्या निवेदेच्या संदर्भात सविस्तर अशी चर्चा झालेली आहे. शासनाचे कोणतेही निर्देश नसतांना मा.आयुक्त यांनी यात १० कोटी जस्तीचे समाविष्ट केलेले आहे. १०९ कोटीचे अंदाजपत्रक आहे यात कमी व जस्त येवू शकते असे मा.आयुक्तांनी म्हटले आहे. १० लक्षपर्यतच्या अंदाजपत्रकास आयुक्त मंजूरी देत असतात व त्यापूढील २० लक्षचे अंदाजपत्रक असेल तर स्थायी समिती व त्यापूढील असल्यास सर्वसाधारण सभेची मंजूरी लागते. हे अंदाजपत्रक या सभागृहासमोर मान्यतेसाठी यावयास पाहिजे होते. निविदा फेटाळणे किंवा मान्य करणे हे सर्व अधिकार आयुक्तांना आहे हे मला माहित आहे. स्थायी समितीने मान्यता दिल्यानंतरही आयुक्त विखंडीत करू शकतात. सन २००२ मध्ये जकात खाजगीकरणाची निविदा निघाली. अगोदर अंदाजपत्रकास स्थायी समिती व सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली होती. समितीने जेंव्हा इतर महानगरपालिकेची माहिती घेतली तेंव्हा त्या त्या महानगरपालिकेने कोणकोणत्या बाबीची पूर्तता करून टेंडर नोटीस काढलेली आहे याची माहिती का घेतलेली नाही. ज्या ज्या महानगरपालिकेत जकातीचे खाजगीकरण झालेले आहे त्याची संपूर्ण माहिती माझ्याकडे आहे. काही महानगरपालिकेने टेंडर नोटीस काढण्या अगोदर स्थायी समितीची तर काही महापालिकेने सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेली असून त्यानंतर पूढील कार्यवाही करण्यात आलेली आहे. परंतू ही सर्व कार्यवाही येथे मा.आयुक्तांनीच केलेली आहे. जकातीचे खाजगीकरण व्हावे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवावे तसेच शहरातील शांतता सुव्यवस्था सुध्दा अबाधीत राहावी ही भावना सभागृहाची आहे. पैसे जस्त मिळतात म्हणून कसल्याही प्रकारची कार्यवाही करणे योग्य होणार नाही. जी चर्चा सभागृहात झालेली आहे हीच चर्चा एकत्रीत बसून केली असती योग्य तो निर्णय घेतला असता. तसा प्रस्ताव सभागृहात येणे आवश्यक होते. या सभागृहाला त्यांचे अधिकारापासून वंचीत ठेवलेले आहे अशी सर्वाचीच भावना झालेली आहे. यापूढे असे नियमबाह्य काम प्रशासनाने करू नये. लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे विकास कामासंदर्भात एकमत

असावे. या सर्व बाबीची नोंद प्रशासनाने घ्यावी व पूढील कार्यवाही करावी अशी सूचना देण्यात येत आहे. आता या विषयावर कुणीही चर्चा करू नये. या विभागाच्या अनुषंगाने जे काही भष्टाचारा संबधी स.सदस्यांनी तक्रार केलेली आहे त्यांना त्याचे मत मांडण्यासाठी ५ तारखेला दालनात बोलवून घ्यावे त्यांचा विषय प्रशासनाने समजवून घ्यावा. व पूढील कार्यवाही करावी. प्रशासन व लोकप्रतिनिधी यांचेत तणावाचे वातावरण निर्माण होणार नाही याची दक्षता प्रशासनाने घ्यावी.

श्री.मुजेब खान :१०१,१०२ कोटीची निविदा आली तर मान्य करावयास पाहिजे नसता प्रशासन सांगणार की, आम्ही तोंडी बोललो होतो. परंतू १०९ कोटीच्या वर आल्यानंतर मान्य करू असे होवू नये.

मा.सभापती : निविदा प्रशासनाने काढलेली आहे. अटी शर्तीही प्रशासनानेच टाकलेल्या असून संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची आहे. मा.आयुक्त यांनी जे खुलासा केलेला आहे इतिवृत्तांत त्याची नोंद झालेली आहे.

श्री.गजनन बारवाल : कामगार शक्ती संघटनेचे अध्यक्ष यांनी एक अपील दिलेले आहे. ६ कामगारांना निलंबीत करण्यात आलेले असून निवेदनात त्यांनी असे म्हटले की जे निलंबन झालेले आहे ते बेकायदेशीर आहे. याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.मुजेब खान : जी संघटना येथे अधिकृत नाही त्यांचे मार्फत जर अपील स.सदस्यांकडे येत असेल तर योग्य नाही. स.सदस्य यांनी त्याचे या कर्मचाऱ्या विषयी मत मांडावे ते योग्य ठरेल.

मा.सभापती : महानगरपालिकेत कोणतीही अधिकृत संघटना नाही. स.सदस्य श्री. गजनन बारवाल यांची भावना समजून आपण निर्णय घेवू शकतो. संघटनेच्या मार्फत मत मांडणे योग्य नाही. कोणत्याही कर्मचाऱ्यावर कार्यवाही करतांना संपूर्ण शहानिशा झाली पाहिजे त्यानंतरच कार्यवाही करावी अशी सूचना उपआयुक्त प्रशासन यांना देण्यात येत आहे. वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यावरच कार्यवाही करून चांगले प्रशासन चालवतो हे न दाखवता इतरही कर्मचाऱ्यावर कार्यवाही झाली पाहिजे आजच्या बैठकीला इतिवृत्त देण्यात आलेले नाही. नगरसचिव यांना इतिवृत्त तयार करण्यासाठी पूरेसा कर्मचारी दयावा म्हणून सर्वसाधारण सभा व स्थायी समिती सभेत वेळोवेळी प्रशासनास सुचना दिलेली आहे. यानंतर इतिवृत्त मिळाले नाही व उपआयुक्त(प्रशासन) यांनी या संबधी दखल घेतली नाही तर स्थायी समितीस कार्यवाही करण्यास भाग पाडू नये. अशी सूचना उपआयुक्त(प्रशासन) यांना देण्यात येत आहे.

श्री.कवरसिंगबैनाडे : मागिल एका बैठकीत अधिकारी यांना मोबाईलसाठी दरमहा ७५० रूपये देण्याचा प्रस्ताव पारीत केलेला होता. आतापर्यत एकाही अधिकाऱ्यांना तशी रक्कम देण्यात आलेली नाही.

मा.सभापती : या सूचनेची संबधीत अधिकारी यांनी नोंद घ्यावी परंतू त्या वेळी स.सदस्यांच्या ज्या भावना होत्या की खऱ्या अर्थाने जस्तीचे काम कनिष्ठ अभियंत्यांना करावे लागते, वेगवेगळया साईटवर त्यांना जवे लागते त्यांनाही मोबाईलसाठी हा खर्च देणे आवश्यक आहे अशा भावना होत्या.

श्री. रेणुकादास वैद्य : विषय पत्रिकेला सुरूवात करावी.

मा.सभापती : पून्हा कर्मचाऱ्याच्या बाबतीत मूद्दा समोर येतो. नगरसचिव यांचेकडे इतिवृत्त तयार करण्यासाठी कर्मचारी नाही, जे आहे त्यांचेकडूनच काम करून घ्यावे लागते. मा.आयुक्त व उपआयुक्त(प्रशासन) यांना कोणते स्वीय सहाय्यक पाहिजे याचा निर्णयच होत नाही इतर बाबतीत तात्काळ निर्णय होतात. अत्यंत जबाबदारीने बोलत आहे. सभागृहाच्या सुध्दा तीव्र भावना आहेत. ज्या सभा संपन्न होतात त्या सभांचे इतिवृत्त तयार करण्याचे काम श्री.के.एस.नवले यांना करावे लागते. अनेक दिवसापासून करीत आहे. ते अस्थायी कर्मचारी म्हणून दैनिक वेतनावर आहे. त्यांना सेवेत कायम केले जत नाही. याची दखल प्रशासन घेत नाही. मा.आयुक्त यांनी याची दखल घ्यावी. रिक्त पदे का भरली जत नाही याचा खुलासा करण्यात यावा.

सौ.लता दलाल : अनेक विभागात अनेक दिवसापासून वेगवेगळया संवर्गातील रिक्त पदे आहेत. ती भरण्याची कार्यवाही त्वरीत करावी. कारण रिक्त पदे भरण्यास शासनाची मान्यता लागत नाही. मजूरांकडे कार्यालयीन कामे दिलेली आहेत. ती कामे त्यांचेकडून काढून घ्यावी व त्यांना वार्ड कार्यालयात सफाईसाठी पाठविण्यात यावे.

श्री.मुजीब खान : इतर राखीव संवर्गातील संपूर्ण भरती करण्यात आलेली आहे परंतू खुल्या संवर्गातील भरती होत नाही. शासनाचे काही डायरेक्शन आहे का खुलासा करावा का भरती होत नाही.

श्री.दिलीप गायकवाड : महानगरपालिकेने जेसीबी वाहन घेतलेले आहे. त्यावर कायमस्वरूपी वाहनचालक आहेत का याचा खुलासा करावा.

मा.सभापती : रिक्त पदे किती आहे खुल्या संवर्गातील किती आहे. इतर संवर्गातील किती आहेत जेसीबी वाहन चालकाची पदे मंजूर होवून आलेली होती का? ते पद भरलेले आहे का नसेल तर का भरलेले नाही, दिरंगाई झालेली आहे का, त्याची कारणे काय आहेत? रिक्त पदाच्या बाबतीत शासनाकडे काही अहवाल पाठविलेला होता का? या संपूर्ण बाबीचा खुलासा उपआयुक्त(प्रशासन) यांनी करावा.

उपआयुक्त(प्रशासन) : खुल्या संवर्गातील व इतर संवर्गातील ५४ पदे भरण्या बाबत जहीरात दिलेली आहे. सात ते आठ हजर अर्ज प्राप्त झालेले असून त्याची छाननी पूर्ण झालेली आहे. जनेवारी अखेरपर्यत ही ५४ पदे यात खुल्या संवर्गातीलही काही पदे आहेत. ही पदे भरण्याची कार्यवाही होईल. त्यानंतर जे काही पदे रिक्त झालेली आहेत त्या संदर्भात जहीरात दिली जईल.

मा.सभापती : संपूर्ण वस्तूस्थितीला धरून खुलासा करावा. खुल्या संवर्गातील किती पदे भरलेली नाही. ११२४ मध्ये किती पदे ही नियमानूसार खुल्या संवर्गातील भरलेली आहेत व किती कर्मचाऱ्यांना शासनाच्या मंजूरीच्या अधीन राहून आदेश दिलेले आहेत याचाही खुलासा करावा. उपआयुक्त खुलासा करीत आहेत याची संपूर्ण नोंद मा.आयुक्त यांनी घ्यावी.

उपआयुक्त(प्रशासन) : वर्ग २ मध्ये १२ पदे, वर्ग ३ मध्ये१०२ पदे रिक्त असून ही पदे भरण्याची कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे. एकंदर पदापैकी २६८ पदे शासन मंजूरीसाठी पाठविण्यात आलेले आहे. त्या पदास मंजूरी आल्यानंतर जे कर्मचारी दैनिक वेतनावर कार्यरत आहेत त्यांना त्या पदावर घेण्यात येईल. यापूर्वी दैनिक वेतनावरील काही कर्मचाऱ्यांना कायम स्वरूपी नेमणूका दिलेल्या आहेत. जेसीबी

वाहन चालक हे पद गेल्या ५ ते ६ वर्षापासून रिक्त आहे. हे पद भरण्याची कार्यवाही सूरू केलेली नाही.

सौ.लता दलाल :११२४ मध्येकिती खुल्या संवर्गातील पदे भरलेली आहे. २६८ मध्येकिती खुल्या संवर्गातील पदे आहे याचा खुलासा करावा.

मा.सभापती : जेसीबी वाहन चालक व इतर वाहन चालकांची किती पदे रिक्त आहे. व कोणत्या संवर्गातील रिक्त आहे. रिक्त असतील तर का रिक्त ठैवलेले आहे माहिती देण्यात यावी.

उपआयुक्त(प्रशासन) : मागिल वेळेस वाहन चालकाची पदे भरलेली आहे ओपन व ओबीसी संवर्गातील ३ ते ४ पदे रिक्त आहे.

मा.सभापती : ओबीसी संवर्गातील एकही पद रिक्त नाही. जेसीबी वाहन चालक, अन्न निरीक्षक व विधीसल्लागार ही खुल्या संवर्गातील पदे आहेत. अशी अनेक पदे खुल्या संवर्गातील रिक्त आहेत. ती का भरली जत नाही याचा खुलासा करावा.

उपआयुक्त (प्रशासन) : अन्न निरीक्षक व विधीसल्लागार या पदाची जहीरात दिलेली आहे जनेवारी अखेर ही पदे भरली जतील.

श्री.मुजेब खान : ११२४ कर्मचाऱ्याच्या भरती संदर्भात मी पत्र दिलेले होते त्यात जवळपास २०० कर्मचारी हे बाहेरचे घेतले आहेत. जे दैनिक वेतनावर कार्यरत होते असे २०० लोकांना त्याचा हक्क होता तो मिळालेला नाही. मोठया प्रमाणात भ्रष्टाचार करून बाहेरचे लोक त्यात भरती केलेले आहे. न्यायालयाने जेष्ठता यादी दिलेली होती त्यानूसार कार्यवाही झालेली नाही. यादीतील लोकांना वगळण्यात आलेले आहे. त्यावेळीही उपआयुक्त यांना मी या संदर्भात कळविलेले होते. ५ ते १० हजर रूपये घेवून खुले आम भ्रष्टाचार होत होता. शासनाचे स्पष्ट आदेश आहेत की या भरती संदर्भात आयुक्त हे जबाबदार राहतील. यात काही अधिकारी यांचे नातेवाईत व एका अधिकाऱ्याची पत्नी ही घरी बसून पगार घेत आहे. बोगस भरती केलेली आहे त्याची यादी आयुक्त यांना मी दिलेली आहे. ५ तारीख सुनावणीसाठी दिलेली आहे सर्व माहिती प्रशासनाच्या निदर्शनास आणून देईल. ज्याना कायम स्वरूपी आदेश द्यावयास पाहिजेहोते त्यांना दिले नाही. ज्यांचा हक्क आहे त्यांचे बाबतीत लवकरात लवकर विचार करावा.

मा.सभापती : उपआयुक्त यांनी जे खुलासा केलेला आहे तो वस्तूस्थितीला धरून नाही. जेसीबी वाहनचालन म्हणून एक दैनिकवेतनावर कर्मचारी कार्यरत आहे. सदर कर्मचारी यांना अतिदक्षतेच्या ठिकाणी जेसीबी मशीन घेवून अतिक्रमण काढण्याचे काम करावे लागते. दैनिक वेतनावर काम करतात त्यांची कोणीही दखल घेत नाही. अतिक्रमणाच्या ठिकाणी अति कठीण परीस्थितीला त्या कर्मचाऱ्यास सामोरे जवे लागते. उद्या त्याचेकडून नको ती घटना घडली किंवा त्याचे बाबतीत काही दुर्घटना घडली तर त्याची व त्या कर्मचाऱ्याच्या कुटूंबाची जबाबदारी कोण घेणार आहे त्यांना काही फायदे मिळणार आहे का नोकरी मिळणार आहे काय? ही कोणतीच कार्यवाही करता येत नाही. उदाहरण द्यावयाचे झाल्यास एक कर्मचारी यांचा ड्रेनेजलाईन मध्ये पाय मोडला होता. अधिकारी यांचा खुलासा असा आला की मी नोंद घेण्यास जेव्हा गेलो तेंव्हा सदर कर्मचारी तेथे नव्हते. म्हणून नाव आलेले नाही. या पेक्षा प्रशासनाचा गलथान कारभार काय असू शकतो. दैनिक

वेतनावरील जे कर्मचारी अनेक महत्वाच्या ठिकाणी काम करतात त्यांचा अपघात झाला तर त्यांचे कुटूबाची जबाबदारी कोण घेणार आहे, याचा खुलासा करावा.

उपआयुक्त(प्रशासन) : दैनिक वेतनावर जे कर्मचारी काम करतात त्यांना नियमानूसार कोणतीही सवलत, फायदे देय नाही.

मा.सभापती : अस्थायी कर्मचारी यांना कोणतेही फायदे देता येत नाही म्हणून खुलासा करता परंतू त्याचेकडून अत्यंत कठीण परीस्थितीच्या ठिकाणी काम करून घेता हे अत्यंत चूकीचे आहे. एका कर्मचाऱ्याचा सेवा करतांना पाय मोडला. एकीकडे सभागृहाची दिशाभूल करायची व जे काम चालू आहे ते तसेच ठेवायचे हे बरोबर नाही. सन ९५,९७ मध्ये वाहनचालक दैनिक वेतनावर घेतलेले कायम केले जत नाही जे सन १९९० मध्ये सेवेत आलेले त्यांना सेवेत कायम केले जते हे बरोबर नाही जे खुल्या संवर्गात येतात त्यांचा विचार केला जत नाही. प्रशासनाची ही पध्दत बरोबर नाही जेसीबी वाहन चालक हे पद ६ वर्षापासून रिक्त आहे कार्यवाही केलेली नाही.

श्री.कवरसिंग बैनाडे : दैनिक वेतनावर किती कर्मचारी कार्यरत आहेत. सन २००४ मध्ये शासनाने विविध खात्यामध्ये जे अस्थायी कर्मचारी म्हणून काम करतात त्यांचे बाबतीत एक पॉलीसी आहे ती काढणे बंधनकारक आहे. त्यानूसार अशा काही घटना घडतात त्यांना मदत म्हणून द्यावयाची झाल्यास अशा प्रकारच्या पॉलीसीमूळे मदत देता येते. मनपामध्ये कार्यरत असलेल्या अस्थायी कर्मचाऱ्याची पॉलीसी काढलेली आहे का.

मा.सभापती : शासनाच्या मंजूरीच्या अधीन राहून किती कर्मचाऱ्यांना आदेश देण्यात आलेले आहे.

श्री. दिलीप गायकवाड : १डिसेंबर २००३ रोजी दै.सामना मध्ये बातमी होती की ४१४ भुखंडामध्ये नगरसेवक अधिकारी दोषी. त्या प्रकरणाच्या सीआयडी विभागाने महानगरपालिकेस संचिका मागविलेल्या होत्या त्यापैकी तीनच संचिका महानगरपालिकेने दिलेल्या आहेत. बाकीच्या संचिका दिलेल्या आहे की नाही, याचा खुलासा करावा.

मा.सभापती : या संदर्भात सीआयडी मार्फत चौकशी चालू आहे त्यावर चर्चा करणे योग्य नाही. जी जे माहिती सीआयडी विभागास पाहिजे आहे ती प्रशासनाने उपलब्ध करून द्यावी अशी सूचना करण्यात येते.

श्री.मुजेब खान :११२४ भरती संदर्भात काय निर्णय घेणार आहात. चौकशी कशा प्रकारे होणार आहे याचा खुलासा करावा.

मा.सभापती : खुल्या संवर्गातील भरती संदर्भात संपूर्ण माहिती ही स्वतंत्र बैठकीत ठेवावी. न्यायालयाच्या आदेशानूसार व शासनाच्या अधीन राहून दिलेल्या ऑर्डर सर्व संचिका एकत्रित करून प्रशासनाने त्यावर अभ्यास करून या सभागृहात ठेवाव्या. तसेच जेसीबी वाहन चालक जे पद ५ वर्षापासून रिक्त असतांना भरलेले नाही. जे कुणी यात दोषी असेल त्याचे वर कार्यवाही करावी. स्थायी समिती समोर अहवाल देण्यात यावा. तसेच इतर पदे त्यात लघुटंकलेखक व मा.आयुक्तांचे स्वीय सहाय्यक हे पद खुल्या संवर्गातील असून ते आजपर्यत रिक्तच आहे. या सर्व बाबतीत माहिती सभागृहासमोर ठेवावी. त्यावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल व

प्रशासनाने चुकीची माहिती दिली तर मा.मुख्यमंत्री व नगरविकास विभागास पाठविण्यात येईल. याची खबरदारी प्रशासनाने घ्यावी.

**विषय क्र.१४४ :**

कार्यकारी अभियंता (ड्रेनेज, विद्युत,इमारती व उद्याने) प्रस्ताव सादर करीत आहे की, प्रभाग क्र.१९ एन-९ रायगडनगर येथे खूल्या जगेत उद्यान विकसित करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन २००४-०५ च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रूपये १०,४८,६५०/- चे तयार करण्यात आले असून सदर अंदाजपत्रक मा.आयुक्त महोदय यांच्या दिनांक २६.१०.२००५ च्या मंजुरीनुसार मे.स्वास्ती आर्किटेक्ट यांना निविदा रक्कमेच्या १% वास्तुविशारद फिस म्हणून देण्याच्या अटीवर तयार करून घेण्यात आलेले आहे.

सदर अंदाजपत्रकामध्ये उद्यानाच्या स्थापत्य कामासाठी व विद्युतीकरण करणेच्या कामासाठी अनुक्रमे रक्कम रूपये ८,३८,६५०/- व २,१०,०००/- ची तरतूद समाविष्ट करण्यात आलेली असून सदर एकत्रित रक्कम रूपये १०,४८,६५०/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी दिनांक २३.११.२००५ अन्वये मान्यता दिलेली आहे.

करीता प्रभाग क्र.१९ एन-९ रायगडनगर येथे खूल्या जगेत उद्यान विकसित करणेच्या रक्कम रूपये १०,४८,६५०/- च्या एकत्रित अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी नियूक्त मे.स्वास्ती आर्किटेक्ट यांना सदर कामाकरिता निविदा रक्कमेच्या १% वास्तुविशारद फिस देण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.कवरसिंग बैनाडे : प्रस्तावात ड्रेनेज विद्युत, इमारती वउद्याने असे आहे. नेमके उद्यानात कोणते काम करण्यात येणार आहे. जी १ टक्का फिस स्वास्ती आर्कीटेक्ट यांना द्यावयाची आहे त्या संदर्भात वृत्तपत्रात निविदा का देण्यात येत नाही. एका ठराविक व्यक्तीचे नाव टाकून त्यांना फीस देणे योग्य वाटत नाही. यात फक्त अंदाजपत्रकास मंजूरी द्यावी.

मा.सभापती : प्रशासनास सुचना करण्यात येत आहे की डायरेक्ट एजन्सीच्या नावासह प्रस्ताव ठेवू नये. कॉम्पीटीशन न होता एजन्सीच्या नावाला हे सभागृह मंजूरी देणार नाही.

कार्य.अभियंता(ड्रे.वि.) : यामध्ये शहरातील जे आर्कीटेक्ट म्हणून काम करतात त्याचेकडून त्या जगेचे नियोजन आराखडा ती जगा कशा पध्दतीने विकसीत करणार आहोत त्याचे मार्गदर्शन घेणार आहेत.

सौ.लता दलाल : महानगरपालिकेकडे आर्कीटेक्टचे पॅनल आहे काय?

शहर अभियंता : महानगरपालिकेत आर्कीटेक्टचे पॅनल असून ते जूने आहे. त्या पॅनलवर हे आर्कीटेक नाही.आर्कीटेक यांना एक ते दीड टक्का फिस देतो आहे तसा ठराव झालेला आहे.

मा.सभापती : जे पॅनलवर आहे त्याचंकडून काम करून घेण्यात यावे या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रभाग क्र.१९ एन-९ रायगडनगर येथे खूल्या जगेत उद्यान विकसित करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रूपये १०,४८,६५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. मनपाच्या आर्कीटेक्टच्या

पॅनलवरील वास्तुविशारद यांचेकडून आवश्यकतेनुसार काम करून घेण्यात यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४५ :**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण,विद्युत,इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.सिल्लेखाना पासून थेट समर्थनगर येथील वरद गणेश मंदिरापर्यंत ४५० मि.मि. व्यासाची आर.सी.सी. स्वतंत्र जलनि:सारण वाहिनी टाकणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २००४-०५ दरसूची आधारे रक्कम रूपये १०,०७,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. या कामास प्रशासकीय मान्यता दिनांक २३.११.२००५ रोजी प्राप्त झाली आहे.

करीता स्थायी समिती मंजूरी करीता प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री.मुजेब खान : यापूर्वी मी १.१० कोटी खर्च करून टाकण्यात आलेली पाईपलाईन संदर्भात माहिती विचारलेली होती. रात्री १२ ते ३ वाजेच्या दरम्यान ट्रायल घेवून कार्यवाही करण्यात येईल म्हणून सांगण्यात आलेले होते. आतापर्यत त्या बाबतीत कार्यवाही केलेली नाही.

मा.सभापती : संबधीत अधिकारी आज सभेला उपस्थित नाही. माहिती घेतली जईल. जेंव्हा अंदाजपत्रक तयार केले जते काम केल्यानूसार पाणी जणार आहे किंवा नाही याची संपूर्ण खात्री झाल्यानंतरच संपूर्ण अहवाल आल्यानंतरच कार्यवाही करावी. जेकी नेहरूनगर कटकटगेट टाकीमध्ये काम करूनही आज पाणी जत नाही. त्यांची पुनरावृत्ती होवू नये याची शहर अभियंता यांनी नोंद घ्यावी व पाणी पूरवठा अधिकारी यांना झालेल्या चर्चेची माहिती दयावी. या प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.सिल्लेखाना पासून थेट समर्थनगर येथील वरद गणेश मंदिरापर्यंत ४५० मि.मि. व्यासाची आर.सी.सी. स्वतंत्र जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्यचा रक्कम रूपये १०,०७,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४६ :**

कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजना (जुनी व नविन) अंतर्गत एकूण सात पंपींग स्टेशन आहेत. या पंपींग स्टेशन करिता विद्युत देयकापोटी सर्वसाधारणपणे दर महिन्याला १.४५ कोटी खर्च होतो. या प्रचंड खर्चात बचत करण्यासाठी सर्व पंपींग मशिनरी जास्तीत जस्त चांगल्या कार्यक्षमतेने चालणे आवश्यक आहे.

जूने जयकवाडी उद्‌भव,ढोरकीन बुस्टर,जुना फारोळा,नक्षत्रवाडी बुस्टर येथील पंप बदलण्यात आल्यामूळे व नविन जयकवाडी उद्‌भव येथील पंपाचे बाऊल असेंम्ब्ली बदलण्यात आल्यामूळे येथील पंपाची कार्यक्षमता चांगली आहे. परंतु नविन फारोळा व क्रांतीचौक पंपगृह येथील पंपामध्ये सुधारणा न केल्यामूळे तुलनात्मकदृष्ट्या कार्यक्षमता कमी झालेली आहे. अशा पंपास किर्लोस्कर कोरोकोट ॲन्टी करोजन कोटींग केल्यास पंपाच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ होवू शकते. अशा आशयाचा प्रस्ताव किर्लोस्कर कंपनीतर्फे प्राप्त झालेला आहे.

किर्लोस्कर कंपनीच्या प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.आयुक्त यांच्या दालनात दि.३०.०६.०५ व दि.१७.०८.०५ रोजे बैठक झाली व हे काम करण्याच्यादृष्टीने अंतिम प्रस्ताव बनविण्यात आलेला आहे. सुरूवातीस प्रायोगिक तत्वावर नविन फारोळा व क्रांतीचौक येथील पंपाचे कोरो कोटींग करण्यात

येणार आहे. या पंपाचे रिपोर्ट बघुन इतर पंपाचे कोटींग करणे बाबत विचार केला जईल. या प्रस्तावानुसार मान्यतेनंतर कोरो कोटींगचे काम किर्लोस्कर कंपनीतर्फे करून घेण्यात येईल व त्या बदल्यात विद्युत खर्चामध्ये होणाऱ्या बचतीमध्ये ३ वर्षाकरीता ९०% रक्कम कंपनीस अदा करावी लागेल. पंपाची वाहतूक व दुरूस्तीसाठी लागणारे स्पेअरपार्ट महानगरपालिकेकडून आवश्यकतेप्रमाणे द्यावे लागतील. या बाबतचा सविस्तर प्रस्ताव (मुद्दे) सोबत सादर करण्यात येत आहे.

मा.आयुक्त यांनी प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव ठेवण्याची शिफारस केलेली आहे. तरी उपरोक्त प्रमाणे कोरो कोटींग करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.गजनन बारवाल : ढोरकीन येथील तसेच फारोळा येथील बुस्टर पंप बदलण्याचा प्रस्तावास मंजूरी दिलेली आहे. यात तीन वर्षाकरीता ९० टक्के रक्कम किर्लोस्कर कंपनीस द्यावयाची आहे.

मा.आयुक्त : जेकाही ३४ कोटी खर्च पाणीपूरवठयावर आहे त्यापैकी २० कोटी खर्च यावर होतो आहे.

श्री.गजनन बारवाल : किती बचत होणार आहे या कंपनीला किती रक्कम दयावी लागणार आहे.

मा.सभापती : संबधीत अधिकारी उपस्थित नाही हा प्रस्ताव तुर्त स्थगित करण्यात येत आहे.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.१४७ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मिलकॉर्नर ते ज्युबलीपार्क रस्त्याचे सौंदर्यीकरण करणेच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन २००४-०५ च्या दरसूचीनुसार र.रू.१०,३८,१२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च २००५-०६ या आर्थिक वर्षात शहर सौंदर्यीकरण या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे. तरी र.रू.१०,३८,१२५/- चे अंदाजपत्रक मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.गजनन बारवाल : बजेट मंजूर होवून सहा महिने झालेले आहे. उशीरा प्रस्ताव येत आहे शहरात आणखी किती ठिकाणी शहर सौदर्यीकरण होणार आहे. कोणत्या बेटाचे करणार आहे, सविस्तर माहिती दयावी.

मा.सभापती : या प्रस्तावास मंजूरी देण्यात येत असून उर्वरीत ज्या ज्या ठिकाणी सौंदर्यीकरण करायचे आहे बजेटमध्ये तरतूद आहे त्यानूसार तात्काळ त्या त्या भागातील सौंदर्यीकरणाचे अंदाजपत्रक तयार करून पूढील बैठकीत संबधीत अधिकारी यांनी सादर करावे.

सौ.लता दलाल : अंजली सिनेमागृहा समोर नागेश्वरवाडी चौकाचे सौंदर्यीकरण होणार होते. काही मालमत्तेच्या संदर्भात वाद होता तो मिटलेला आहे. अजूनही स्टेटस्कोची कॉपी मिळविली की नाही मला माहिती दिलेली नाही. कॅव्हेट दाखल करणार नाही पून्हा कूणीतरी स्थगिती आदेश आणेल पून्हा ते काम अनेक वर्ष होणार नाही. या बाबतची माहिती देण्यात यावी.

प्र.विधी सल्लागार : नागेश्वरवाडी चौकाच्या संबधी जे प्रकरण होते ते सर्व खारीज झाल्यासंबधी स.सदस्या सौ. लता दलाल यांना माहिती दिलेली आहे. त्या संबधीची प्रत आणलेली असून संबधीत विभागाला लेखी माहिती दिलेली आहे. आज रोजी तेथे शहर सौंदर्यीकरण करण्यास कोणतीही अडचण नाही.

मा.आयुक्त : शहर अभियंता यांनी चौकशी करावी की यात चूक कोणाची आहे, हे काम का थांबलेले आहे.

मा.सभापती : गलथान पध्दतीने प्रशासनाचे काम चालू आहे. जे अधिकारी एखाद्या कामाकडे जणूनबूजून दुर्लक्ष करीत असेल तर कार्यवाही करण्यात येईल. विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिलकॉर्नर ते ज्युबलीपार्क रस्त्याचे सौंदर्यीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.१०,३८,१२५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४८ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मिलकॉर्नर, खडकेश्वर ते महात्मा फुले चौक, औरंगपुरा रस्त्यावर फुटपाथ बांधणेच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन २००४-०५ च्या दरसूचीनुसार र.रू.१५,३५,४२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च २००५-०६ या आर्थिक वर्षात शहर सौंदर्यीकरण या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे. तरी र.रू.१५,३५,४२५/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.सभापती : अतिक्रमण हटवितांना टपऱ्या काढण्यात आलेल्या असून जगा रिकाम्या करून घेतल्या आहेत. त्या भागात त्वरीत रस्ता करण्याची आवश्यकता आहे. कारण टपऱ्या हटविल्यानंतर चार आठ दिवसांनी पुन्हा अतिक्रमण होते. ते होता कामा नये अतिक्रमण काढतांना महानगरपालिकेस जे मनुष्यबळ, खर्च लागतो तो वाया जतो. त्यासाठी जेथे अतिक्रमण काढावयाचे आहे त्या संबधीचा प्रशासनाने आराखडा तयार करावा करून रस्ता रिकामा केल्यानंतर त्या रस्त्याचे काम तात्काळ करण्याचीही कार्यवाही झाली पाहिजे अशी प्रशासनास सुचना करण्यात येत आहे. हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

मा.आयुक्त : पूढील स्थायी समितीमध्ये २५ लक्षचे फुटपाथ व रस्त्याचे कामाचे अंदाजपत्रक मंजूरीसाठी येतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिलकॉर्नर, खडकेश्वर ते महात्मा फुले चौक, औरंगपुरा रस्त्यावर फुटपाथ बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.१५,३५,४२५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४९ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वरद गणेश मंदीर ते सावरकर चौक या रस्त्याचे सौंदर्यीकरण करणेच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन २००४-०५ च्या दरसूचीनुसार र.रू.११,६३,१२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च २००५-०६ या आर्थिक वर्षात शहर सौंदर्यीकरण या लेखाशिर्षातून करण्यात

येत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे. तरी र.रू.११,६३,१२०/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वरद गणेश मंदीर ते सावरकर चौक या रस्त्याचे सौंदर्यीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.११,६३,१२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५० :**

कार्यकारी अभियंता (ड्रेनेज, विद्युत, इमारती व उद्याने) प्रस्ताव सादर करीत आहे की, मनपा प्राणी संग्रहालय येथे पाणघोड्याच्या पिंजऱ्यासाठी बांधकाम करणे बाबतच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन २००४-०५ च्या जिल्हा दरसूचीनुसार र.रू.११,०९,९९५/- चे तयार करण्यात आले असून सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.१३.१२.२००५ नुसार शिफारस केलेली आहे. प्राणी संग्रहालयाच्या सदर कामासाठी अर्थसंकल्प सन २००५-०६ मध्ये र.रू.२०.०० लक्षची तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

करीता र.रू.११,०९,९९५/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा प्राणी संग्रहालय येथे पाणघोड्याच्या पिंजऱ्यासाठी बांधकाम करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.११,०९,९९५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरातील काही मुख्य रस्ते तसेच महत्वाचे विकास योजना रस्ते ऊशाषषशीशव झरूशीं धर्तीवर रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे (डांबरी रस्ते) प्रस्तावित आहे.

प्रस्तावित रस्त्यांचे सर्वेक्षण करणे, तसेच रस्त्याचे खठउ व खड तसेच तत्सच कोडप्रमाणे डिझाईन करणे, कामाचे अंदाजपत्रक तयार करणे, तसेच निविदापूर्व व निविदा काढल्यानंतर सर्व प्रक्रियेत महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार म्हणून काम पहाणे, यासाठी मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या दालनात दि.५.१०.२००५ रोजी झचउ चे प्रतिनिधी हजर होते. सदर बैठकीत सर्व प्रतिनिधींना त्यांच्या फर्मची माहिती तसेच कामाच्या अनुभवाबाबत माहिती असलेली पुस्तिका सादर करण्याबाबत सुचविले. त्यानुसार श्रीखंडे कन्सल्टंट, मुंबई व सनग्रेस इंजिनियरींग प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड, पुणे यांनी त्यांच्या फर्मची माहिती व अनुभवाबाबत माहिती पुस्तिका सादर केलेली असून सदर माहिती पुस्तिकेवरून श्रीखंडे कन्सल्टंट मुंबई, यांना रस्ते बांधकामाकरीता झचउ म्हणून भरपुर अनुभव दिसून येतो. सनग्रेस इंजिनियरींग प्रोजेक्ट प्रा.लि. यांना पाटबंधारे कामाचा भरपूर अनुभव आहे. या बाबी विचारात घेता श्रीखंडे कन्सल्टंट प्रा.लि. मुंबई यांना झचउ म्हणून नेमणूक करणे योग्य राहील.

ऊशाषषशीशव झरूशीं धर्तीवर खालील रस्त्यांचे डांबरीकरण (डांबरी रस्ते) करण्याचे प्रयोजन आहे. सदर रस्त्यांची यादी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | रस्त्याचे नांव | अंदाजेलांबी (मीटर) |
|---|---|---|
| १ | एकता चौक ते सुतगिरणी चौक (८०' रूंद रस्ता) | ११०० |
| २ | पीरबाजर ते एकता चौक (८०' रूंद रस्ता) | १२०० |
| ३ | हॉटेल पंचवटी ते कोकणवाडी (८०' रूंद रस्ता) | ७५० |
| ४ | सावरकरचौक (टिळकनगर) ते जवाहरनगर पोलीस स्टेशन(८०' रूंद | १४०० |

| | | |
|---|---|---|
| | रस्ता) | |
| ५ | शहागंजचमन सभोवतालचा रस्ता (८०‘ रूंद रस्ता) | ५०० |
| ६ | रोशनगेट ते सेंट्रल जकात नाका (१००‘ रूंद रस्ता) | ९५० |
| ७ | समर्थनगर ते सिल्लेखाना (८०‘ रूंद रस्ता) | ९०० |
| ८ | क्रांतीचौक ते पैठणेट (१००‘ रूंद रस्ता) | १००० |
| ९ | मोंढानाका ते जफरगेट (८०‘ रूंद रस्ता) | ८०० |
| १० | बीबीका मकबरा ते टाऊन हॉल (१००‘ रूंद रस्ता) | ११०० |
| ११ | आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक | ७०० |
| १२ | एस.एस.सी.बोर्ड ते पीरबाजर (५०‘ रूंद रस्ता) | ७०० |
| १३ | हॉटेल वेदांत ते आनंद गाडे चौक (८०‘ रूंद रस्ता) | ९०० |
| १४ | रंगारगल्ली रस्ता (५०‘ रूंद रस्ता) | ७०० |

उपरोक्त रस्त्यांचे ऊशषषशीशव झरूशर्ी धर्तीवर डांबरीकरण करण्याकरीता अंदाजे रू.२३ कोटी एवढा खर्च येईल व काम पूर्ण झाल्यानंतर काम करणाऱ्या कंत्राटदारास प्रत्येक वर्षी खालीलप्रमाणे एकूण खर्चाच्या खालील टक्केवारीप्रमाणे रक्कम देण्यात येईल.

प्रथम वर्ष २०%
दुसरे वर्ष २०%
तिसरे वर्ष ३०%
चौथे वर्ष ३०%

तरी झचउ ची नेमणूक करण्यासाठी तसेच नियोजित डांबरीकरण रस्त्याच्या नावांना मंजुरी मिळणेकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता मिळणेकरीता मा.स्थायी समितीमार्फत प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री. कवरसिंग बैनाडे :२२ कोटीची कामे करणार आहोत. पीएमसी नियूक्त करून काम का करण्यात येते. टेडंर का मागविले नाही.

मा.आयुक्त : हा प्रस्ताव टेंडर कॉल करून आलेला आहे. आजरस्ता केला जतो पून्हा खोदल्या जतो तेथे पाईपलाईन टाकायची असते व कॉन्टेटी व क्वॉलीटी बद्दल वाद होतात. जर मोठे रस्ते करायचे असेल तर सर्व माहितीची खात्री करून घ्यायची आहे. क्वॉलीटी चांगली असावी. जेणे करून पाच ते सहा वर्ष पून्हा त्या रस्त्यावर काम करण्याची गरजपडू नये.

श्री.कवरसिंग बैनाडे : महानगरपालिकेचे अधिकारी आहे त्यांनी लक्ष द्यावे. पीएमसी नेमण्याची गरज नाही.

मा.आयुक्त : महानगरपालिकेकडे मनुष्यबळ नाही. एमएसआरडीसी असेल किंवा कोणतीही संस्था असेल ते पीएमसी नेमून काम करतात. कामाची क्वॉलीटी चेक करतात. कुठे अडचण येते ते दाखवतात.

मा.सभापती : प्रस्तावानुसार या कामाची कार्यवाही किती दिवसात होणार आहे व आणखी काही रस्ते समाविष्ट करणार आहोत का व किती खर्च लागणार आहे याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.गजनन बारवाल : डिफर्ड पेमेन्टवर काही रस्ते करण्याची कार्यवाही करीत आहोत. एकद्या रस्त्याचे डांबरीकरण केल्यानंतर किमान तीन वर्ष त्यावर देखभाल दुरूस्तीचा खर्च होवू नये

जे रस्ते नमूद केलेले आहे त्याची क्वॉलीटी व किती वर्षापूर्वी डांबरीकरण केलेले होते.

अति.शहर अभियंता : या वर्षाच्या अर्थसंकल्पात डिफर्ड पेमेन्टवर काही रस्ते करण्यासाठी तरतूद केलेली आहे. एकूण या वर्षी २० कोटीचे कामाचे अंदाजपत्रक केलेले असून २२ कोटी खर्च येईल. प्रस्तावात एकूण १४ रस्ते दिलेले आहे. यासाठी पीएमसी नेमणार आहोत त्यासाठी प्रस्ताव मंजूरीसाठी ठेवलेला आहे.

मा.सभापती : या संपूर्ण रस्त्याची वेबसाईट या सभागृहात दाखविण्यात यावी. तूर्त हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे.

श्री.मुजीब खान : मौलाना आझाद चौक ते रोषण गेट ते चेलीपूरा ते टाऊनहॉल पर्यतच्या रस्त्याचे काम हे केव्हा होणार आहे.

मा.सभापती : सदर या रस्त्याचे काम एमएसआरडीसी मार्फत होणार आहे. बजेट असतांना देखील जगा उपलब्ध नव्हती म्हणून काम झालेले नाही. जे जगा संपादनाच्या बाबतचा प्रस्ताव होता तो सुध्दा मंजूर झालेला असून मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत कार्यवाही होत आहे पेमेन्ट देण्यास अडचण नाही.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१५२ :**

अग्निशमन दलासाठी अग्निशमन साहित्य खरेदीसाठी रू.५० लाख आर्थिक तरतुद वर्ष २००५-०६ साठी ठेवण्यात आलेली आहे.

घऊॠ४०० - घळीश्रींज्ञशी
झींा षींलींर्ळींि
उ्ळराशींशी - ३‘
झींा विशश्रर्ळींशीू
डळूश - क२१/२ + १×१’
चरु हशरव - ७५ च
चरु उ्ळीलहरीसश - ७५० ङळीं./चर्ळा.
डींलींर्ळींि ङळषीं - ७ च
झींा इविू - अश्रश्रींाळर्ळीा अश्रश्रू

एकूण ४ पंपाकरीता र.रू.२७,४४,०००/-खर्चाचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर आर्थिक खर्चाच्या मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.कवरसिंग बैनाडे : या प्रस्तावा संबधी माहिती दयावी. आताच पंप घेण्याची गरज का भासलेली आहे प्रस्ताव जेंव्हा येतो किर्लोस्कर कंपनीचे नाव टाकून का येतो.

मुख्य अग्निशमन अधि. : अग्निशमन विभागात सध्या चार पंप असून ते १० ते १५ वर्षापूर्वीचे जूने आहे. १० वर्षापेक्षा जस्त कालावधी पंप वापरता येत नाही कारण ते पूर्णपणे खराब झालेले आहे. ही कंपनी संपूर्ण महाराष्ट्रात भारतामध्ये अग्निशमन दलाच्या पंपाच्या बाबतीत स्पेशालिस्ट आहे. हे कमी वजनाचे पंप आहेत.

श्री.कवरसिंग बैनाडे : सविस्तर प्रस्ताव का ठेवलेला नाही. गॅरंटी काय देणार आहे. टेंडर कॉल का करीत नाही.

मा.सभापती : हा प्रस्ताव तूर्त स्थगित करण्यात येत आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१५३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.सभापती, वॉर्ड 'अ' यांना महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमधील दालन देण्यात आलेले आहे. सदर दालन अद्यावत करून मा. सभापती, वॉर्ड 'अ' यांना बसणेकरीता दालन तयार करण्याच्या कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,४०,३६२/- चे तयार करण्यात आलेले आहे. काम तातडीने करून घेण्याच्या सूचना मा. सभापती, वॉर्ड 'अ' यांनी दिलेल्या असल्यामुळे मे.सागर कन्स्ट्रक्शन या एजन्सीकडून काम करून घेतले आहे. तरी सदर अंदाजपत्रकास कार्योत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.कवरसिंग बैनाडे : यापूर्वी किती पदाधिकारी, अधिकारी यांना नवीन कॅबीन उपलब्ध करून दिल्या आहे व त्या खर्चास स्थायी समितीची मंजूरी घेतलेली होती का? खुलासा घेण्यात यावा.

शहर अभियंता : वार्ड अ चे सभापती याचे कॅबीनचे अंदाजपत्रक तयार करून काम करून घेण्यात आलेले आहे स्थायी समितीच्या कार्योतर मंजूरीसाठी ठेवलेले आहे.

श्री.कवरसिंग बैनाडे : कॅबीनचे काम केलेले असून त्या खर्चाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव आलेला आहे. यापूर्वी किती कॅबीनचे खर्चास या सभागृहाची मान्यता घेतलेली आहे.

मा.सभापती : कॅबीनचे काम करण्यात आले नंतर प्रस्ताव मंजूरीसाठी येतो. हे काम तातडीचे होते का असा स.सदस्यांचा प्रश्न आहे. आणि ६७ (३) सी मध्ये कोणकोणती कामे येतात याचाही खूलासा करावा.

शहर अभियंता : ६७(३)सी मध्ये पाणी पूरवठा ड्रेनेजचे किंवा आर्थिक मदत देण्याचे काम असू शकते.

सौ.लता दलाल : महानगरपालिकेच्या इमारतीमध्ये असे किती कॅबीन केलेल्या आहेत जेकी विना टेंडर कामे केलेली आहे.

शहर अभियंता : वर्ग १ अधिकाऱ्यांचे कॅबीनचे अशी ५ ते ६ कामे केलेली आहे.

श्री.कवरसिंग बैनाडे : ७० हजराची कामे होत नाही वारंवार बोलावे लागते. २ लक्ष खर्च करून दोन दिवसात कॅबीन तयार होते,याची खंत वाटते.

मा.सभापती : नारेगाव शाळेत स्लम भागातील विदयार्थी शिक्षण घेतात त्याचेकडे वाटर बॅग नसते. त्या शाळेत पाण्याची सुविधा करावी म्हणून अनेक वेळा प्रस्ताव मंजूर केला अद्यापही काम केलेले नाही. अशी कामे ही ६७(३) सी मध्ये येतात ती करणे गरजेचे असतांना होत नाही. तसेच एन-७ शाळेसाठी देखील जलवाहिनीचे काम केलेले नाही सहा महिण्यापूर्वी पत्र दिलेले आहे. जेकाम प्रशासन करते ते योग्य नाही. याची खबरदारी घ्यावी व जेनियमात बसत नाही अशी जी कामे केलेली आहे त्या कामाचा अहवाल यासभागृहात ठेवावा. प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.सभापती, वॉर्ड 'अ' यांना महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमधील दालन देण्यात आलेले आहे. सदर दालन अद्यावत करून मा. सभापती, वॉर्ड 'अ' यांना बसणेकरीता दालन तयार करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१,४०,३६२/- च्या अंदाजपत्रकास तसेच मे.सागर कन्स्ट्रक्शन या एजन्सीकडून करून घेण्यात आलेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५४ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाने निर्णय क्रमांक वित्त विभाग मभवा/११०५/प्र.क्र.५/सेवा-९ मंत्रालय, मुंबई दि.८ नोव्हेंबर २००५ नुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दि.१ नोव्हेंबर २००५ पासून महागाई भत्ता वाढ ४% मंजूर केलेली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना दि.१.११.२००५ पासून महागाई भत्ता १७% ऐवजी २१% अदा करण्यासाठी प्रती माह रू.७.५८ लक्ष खर्च अपेक्षित आहे. सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पात वेतन व भत्ते अदा करण्यासाठी स्वतंत्र तरतुद करण्यात आलेली आहे. महानगरपालिका कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर २००५ पर्यंत एक महिन्याचे थकबाकीचे देयक डिसेंबर २००५ मध्ये अदा करण्याच्या व डिसेंबर २००५ च्या मासिक वेतनापासून नियमित पगारात १७% ऐवजी २१% महागाई भत्ता समाविष्ट करण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णयानुसार औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना दि.१.११.२००५ पासून ४% महागाई भत्ता वाढ मंजूर करण्यात येते. तसेच महानगरपालिका कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर २००५ पर्यंत एक महिन्याचे थकबाकीचे देयक डिसेंबर २००५ मध्ये अदा करण्याच्या व डिसेंबर २००५ च्या मासिक वेतनापासून नियमित पगारात १७% ऐवजी २१% महागाई भत्ता समाविष्ट करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५४/१ :**

दिनांक ११ व १२ फेब्रुवारी दरम्यान औरंगाबाद येथे ब्राम्हण महासभेचे अधिवेशन होत आहे. या अधिवेशनाकरीता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लोक येणार असून जवळपास दोन लाख लोकांची उपस्थिती या अधिवेशनाकरीता राहणार आहे. सदरील अधिवेशन मनपाच्या गरवारे क्रिडा संकुल या ठिकाणी घेण्याचे निश्चित केलेले असून अधिवेशनाकरीता मनपाचे गरवारे क्रिडा संकुल नाममात्र १०००/- (एक हजर रूपये) शुल्क आकारून उपलब्ध करून देण्यात यावे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : रेणुकादास वैद्य अनुमोदक : सौ. लता दलाल

**ठराव :**

दिनांक ११ व १२ फेब्रुवारी दरम्यान औरंगाबाद येथे होत असलेल्या ब्राम्हण महासभेच्या अधिवेशनाकरीता मनपाचे गरवारे क्रिडा संकुल नाममात्र रू.१०००/- (एक हजर मात्र) शुल्क आकारून उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५४/२**

(दि.१५.१२.२००५ च्या सभेतील स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र. १२८)

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील दुकाने व व्यावसायिक अस्थापना यांचा सर्व्हे करण्याकरीता वृत्तपत्रातून जहीर निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. एकुण ३ निविदा विक्री झाल्या होत्या व निविदा स्विकृतीच्या तारखेस खालील एजन्सीने निविदा सादर केलेल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. ए.एस.असोसिएटस्, मुंबई | रू.१६,०८,९२०/-, सर्व्हे कालावधी १२० दिवस |
| २. | मे. टंडन अँडअसोसिएटस्, मुंबई | रू.१९,३४,९२०/-, सर्व्हे कालावधी १२० दिवस |
| ३. | मे. ट्रेन्डी सिस्टीम मुंबई | रू.१९,८४,९२०/-, सर्व्हे कालावधी १८० दिवस |

उपरोक्त तिन्ही एजन्सीपैकी मे.एस.एस.असोसिएटस्, मुंबई यांनी दुकाने व व्यावसायिक अस्थापना सर्व्हेसाठी रू.१६,०८,९२०/- फीस तसेच १२० दिवस कालावधीत सर्व्हे पुणे होईल असे आहे. या एजन्सी मार्फत खालील कामे करण्यात येणार आहेत.

१. महानगरपालिका हद्दीतील दुकाने व व्यावसायिक अस्थापना सर्व्हेचे काम.
२. सॉफ्टवेअर तयार करणे.
३. सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण महानगरपालिका कर्मचाऱ्यांना देणे.
४. सर्व्हेची सर्व माहिती ठऊइचड ऊअढअ इअडए मध्ये एछढएठ करणे.
५. सर्व्हेचे नकाशे सादर करणे.
६. उजचइझअउढ ऊखडघ सर्व सर्व्हे रिपोर्ट देणे.
७. ठएतएछणए उजङडएउढखञ्छ करिता सोपी पध्दती सुचीत करणे.
८. सर्व्हेनुसार असीपनांना द्यावयाचे नोटीसेस तयार करून त्यांचे वितरण करणे इत्यादी.

उपरोक्त नुसार कामांचा समावेश या निविदेमध्ये आहे, यापासून महानगरपालिकेस वार्षिक रू.७५.०० लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे.

संबंधीत एजन्सीला दि.१६.११.२००५ रोजी वाटाघाटीस बोलविले असता एजन्सीने रू.१६,०८,९२०/- निविदा रक्कमेऐवजी रू.१४,९९,०००/- रक्कमेत सर्व्हेचे काम करण्याची तयारी दर्शविली आहे. करिता मे.एस.एस.असोसिएटस् यांचे समवेत वाटाघाटीअंती निश्चित केलेले दराची निविदा स्विकारणे करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.सभापती : दिनांक १५.१२.२००५ रोजीच्या बैठकीत जे दुकानाच्या सर्वेच्या संदर्भात प्रस्ताव स्थगित केलेला होता त्यास मान्यता देण्यात येते.

मा.आयुक्त : महानगरपालिकेचे लायसन्स घेतल्याशिवाय कुणीही व्यवसाय करू शकत नाही आजपर्यंत कूणीही अर्ज केलेला नाही. लायसन्स घेणे बंधनकारक आहे. कमीत कमी दरवर्षी ५० लक्ष ते १ कोटी रूपये मिळतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील दुकाने व व्यावसायिक अस्थापना यांचा सर्व्हे करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदाधारकांपैकी मे.एस.एस.असोसिएटस् यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम रू.१६,०८,९२०/- या निविदा रक्कमेऐवजी रू.१४,९९,०००/- रक्कमेत सर्व्हेचे काम मे.एस.एस.असोसिएटस्,मुंबई यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

मा.सभापती : स.सदस्यांचे लेखाशिर्षक बदलण्याचे प्रस्ताव आलेले आहेत त्या सर्व प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

श्री.मुजेब खान : लेखा शिर्षक बदण्याचे प्रस्तावास लेखा विभागा मार्फत असे सांगितले जते की सर्वसाधारण सभेची मान्यता पाहिजे

मा.सभापती गेल्या १९ तारखेपर्यतचे जे लेखाशिर्षक बदलण्याचे प्रस्ताव स्थायी समितीने मंजूर केलेले आहे त्यास सर्वसाधारण सभेचीही मंजूरी घेण्यात आलेली आहे.

श्री.मुजेब खान : रेटलिस्टचे लहानसे काम असेल तरी स्थायी समितीच्या दोन सदस्यांची स्टॅम्प पेपरवर सही घ्यावी लागते.

मा.आयुक्त : ॲक्ट नुसार सही घेणे आवश्यक आहे.

मा.सभापती : मा.आयुक्त यांना सूचना करण्यात येत आहे की. आजच्या बैठकीत जी चर्चा झालेली आहे ज्या सुचना मांडलेल्या आहेत त्याची दखल घेण्यात यावी व ज्या कामांना गती नाही ती कामे तातडीने करण्याची कार्यवाही करावी. जे अधिकारी

कामात कसूर करीत असतील तर कार्यवाही करावी. कोणत्याही अधिकाऱ्यांनी पेपरबाजी करू नये. जर तसे सिध्द झाले तर विना चौकशी कार्यवाही होईल. यापूर्वी काही अधिकाऱ्यांवर आयुक्त यांनी कार्यवाही केलेली होती.

श्री.मुजेब खान : माझ्या वार्डात ७ लक्षचे डांबरीकरणाचे कामाचे टेंडर कॉल करण्यात आले होते काम त्वरीत सूरू होईल असे आयुक्तांनी म्हटले होते. परंतू दिनांक १३.१२.२००५ च्या टेंडर कॉलमध्ये पून्हा आलेले आहे. यांचे कारण काय याची चौकशी झाली पाहिजे सर्व पूरावा आपल्याकडे सादर केला जईल .

मा.सभापती : स.सदस्य श्री. मुजेब खान यांनी जे काही सूचना केली आहे त्याचे वार्डातील कामाचे टेडर रिकॉल करण्यात आलेले. ते का करण्यात आलेले आहे याची आयुक्तांनी माहिती घ्यावी. तसेच एखादे कामाची निविदा आल्यानंतर किती टक्के बिलो पर्यत काम मंजूर केले पाहिजे याची मर्यादा ठेवावी. जेणे करून क्वॉलीटीमध्ये कुठल्याही प्रकारे तडजेड होणार नाही. याची खबरदारी घ्यावी.

''राष्ट्रगितानंतर''सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.